पुणे, किशोर– वर्ष ५२, अंक ८ वा, ऑगस्ट २०२३, (मासिक)– किंमत रु. ७/– पृष्ठे– ५२
Pune, Kishor- Vol. 52, Issue- 8, August 2023 (Monthly)- Price Rs. 7/- Pages- 52

# किशोर

ऑगस्ट २०२३

के. शिवम् मूर्ती (अवकाश शास्त्रज्ञ)





# वंदन माझ्या देशाला

रामचंद्र ढेरे

या देशाची पवित्र माती लावितो आमच्या भाळाला
सदैव माझे पहिले वंदन माझ्या भारत देशाला.

अनेक धर्म, अनेक जाती, इथे नांदती सौख्यात
प्रेम सदैव फळते येथे, प्रेमळ आमच्या हृदयात
गाडू सारे भेदभाव हे, एकसंध ठेवू देशाला
सदैव माझे पहिले वंदन माझ्या भारत देशाला

सीमेवरती लढती सैनिक, रक्षण करण्या देशाचे
घाम गाळतो शेतकरी दादा, भूक शमविण्या जगताची
करतो आम्ही सलाम सारे त्यांच्या देशसेवेला
सदैव माझे पहिले वंदन माझ्या भारत देशाला

या देशाचे नागरिक आम्ही, करू प्रार्थना देवाची
तिरंग्याने मिळो प्रेरणा, सुख शांती समृद्धीची
ठेवू फडकत आम्ही तिरंगा मार्ग दाखविण्या जगताला
सदैव माझे पहिले वंदन माझ्या भारत देशाला

संपर्क : ९२८४५७५७८८





**किशोर** ऑगस्ट २०२३, वर्ष ५२ वे, अंक ८ वा, अ.श्रावण-नि.श्रावण, शके १९४५



**संपादक :**
कृष्णकुमार पाटील, संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**प्रकाशक :**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

**निर्मिती अधिकारी :** हेमंत बाबर

**अक्षरजुळणी :** किशोर विभाग

**कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

**वितरण व्यवस्थापक**
जालिंदर पाटील

**मुखपृष्ठ :** श्रीनिवास प्रभुदेसाई
संपर्क : ९८३३७६७०३५

**चित्रांकन :** चारुहास पंडित, श्रीनिवास प्रभुदेसाई, घनश्याम देशमुख, धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, योगिता धोटे, माईंडइट संवाद, जैत्र डिजिटल, अमृता ढगे, गणेश ढवळे



## अंतरंग



- वंदन माझ्या देशाला ... *रामचंद्र ढेरे* ... ०२
- क्रांतिकन्या हौसाताई पाटील ... *प्रा. राजा माळगी* ... ०६
- झेंडा तिरंगी ... *शंकर विटणकर* ... ०९
- युआन श्वांग ... *प्रशांत सरुडकर* ... १०
- रामभरोसे थापाड्या ... *श्रीकांत बोजेवार* ... १२
- हुतात्मा नाग्या कातकरी ... *श्रीनिवास गडकरी* ... १६
- प्रिय आमचा देश ... *सतीश खरात* ... १९
- गोष्ट खाज्या नाईकची ... *नरेंद्र दाभाडे* ... २०
- काव्यकोडी ... *एकनाथ आव्हाड* ... २४
- भाऊराया ... *योगेश देवकर* ... २५
- राखी पौर्णिमा ... *रामकृष्ण अघोर* ... २६
- श्रावण आला ... *शं.ल. नाईक* ... २९
- चला चांगुलपण पेरूया ... *मनोज बोरगावकर* ... ३०
- आली पालखी ढगांची ... *प्रवीण दवणे* ... ३३
- ॲमेझॉनच्या जंगलात...चाळीस दिवस ... *मृणालिनी वनारसे* ... ३४
- कुतूहल ... *अमित डहाणे* ... ३८

**बालविभाग**
- भावी आधारस्तंभ ... ४०
- उमलती प्रतिभा ... ४२
- चित्रकथा : पाठलाग ... *घनश्याम देशमुख* ... ४४
- गमाडी गंमत ... *योगिराज माने* ... ४६

**ENGLISH SECTION**
- The Raindrop ... *Santosh Alanjkar* ... ४७
- Aarya's Reward ... *Anita Mehar - Dadhe* ... ४८
- Funny Puzzle ... *Ghanshyam Deshmukh* ... ५०



**ऑनलाइन वर्गणीकरिता :** www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनीऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,** सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४ संपादकीय : ०२०- २५७१६१०७ वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४ ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in



# प्रिय किशोर




जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आमला तालुका व जिल्हा हिंगोली

***सुंदर सुंदर चित्रे आणि सुंदर सुंदर गोष्टी,***
***सुंदर सुंदर कविता, त्यांची होती सुंदर गाणी***
***कुतूहलाचे प्रश्न वाचून उत्तर शोधतो आम्ही***
***चित्रकोड्याची गंमत शोधण्या डोके लढवतो नामी...***



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पुरी, ता. चांदवड, जि. नाशिक



# गाऊ स्वातंत्र्याचे गान...

१५ ऑगस्ट हा भारतीय स्वातंत्र्यदिवस. आपणा सर्व भारतीयांसाठी अतिशय मोलाचा, सन्मानाचा, अभिमानाचा दिवस. आपल्या देशाच्या इतिहासाच्या पानांत सुवर्ण अक्षरांनी कोरलेला एक अविस्मरणीय दिवस होय. अनेक ज्ञात - अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या, क्रांतिकारकांच्या अनमोल बलिदानामुळेच आपण हा सुवर्ण दिवस पाहू शकतोय, साजरा करू शकतोय. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील कामगार, शेतकरी, आबालवृद्धांसोबतच अनेक महिलांचा मौल्यवान व धाडसी सहभाग, त्यांचा त्याग हा प्रत्येक भारतीयांची मान अभिमानाने उंचावणारा असाच आहे. यातीलच एक कहाणी मणिपूरच्या गाइदिन्ल्यू या अवघ्या १३ वर्षांच्या मुलीची आहे. जी भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत म्हणजे जवळपास पंधरा वर्षे इंग्रजांच्या कैदेत राहिली. आपल्या देशासाठी, नागा प्रजेच्या सन्मानासाठी या शूरवीर बालिकेने दोन महिने कोहिमा, पाच महिने इंफाळ, एक वर्ष गुवाहाटी, सहा वर्षं शिलाँग, तीन वर्षं आईझोल (मिझोराम) व उर्वरीत काळ तुरा येथे तुरुंगवास भोगला. तिची कहाणी तुम्हां-आम्हां सर्व भारतीयांसाठी अतिशय प्रेरणादायी आहे.

लहानपणापासूनच अतिशय धाडसी असणाऱ्या गाइदिन्ल्यू हिचा जन्म २६ जानेवारी १९१५ रोजी मणिपूरमधील लोंग्काओ (नुन्काओ) येथे झाला. गाइदिन्ल्यू या तिच्या नावाचा अर्थ 'चांगला मार्ग दाखवणारी' असा होतो. या भागात शाळा नसल्यामुळे तिचे शिक्षण होऊ शकले नाही. या काळात संपूर्ण भारतभर जुलमी इंग्रजांच्या विरोधी लढे सुरू होते. गाइदिन्ल्यूचा चुलतभाऊ जादोनांग याने मणिपूर- नागालँडमधून इंग्रजांना बाहेर हाकलून लावण्यासाठी हेराका नावाचे एक आंदोलन सुरू केले होते. तेरा वर्षांची गाइदिन्ल्यू आपल्या भावाच्या आंदोलनात मनःपूर्वक सहभागी झाली. पुढे इंग्रजांनी जादोनांगला पकडून फाशी दिले. त्यामुळे सुमारे चार हजार क्रांतिकारी लोकांचे संघटन असलेल्या हेराका आंदोलनाचे नेतृत्व गाइदिन्ल्यूकडे आले. त्या वेळी ती अवघ्या सोळा वर्षांची होती आणि गनिमी काव्यात, शस्त्र चालवण्यात तरबेज झालेली होती. तिने नागा जमातीमधील वेगवेगळ्या गटांना एकत्र आणून इंग्रजांच्या विरोधात आंदोलन उभे केले. तिच्या सेनेत मोठ्या संख्येने नागा युवक व युवती भरती झाले. तिने देशभक्तीपर गाणी, भजने रचली आणि आपल्या सेनेतील सैनिकांना शिकवली.

आपल्या परिसरातील लोकांना इंग्रज सरकारला कर न देण्याचे आवाहन केले. लोकांनी याला अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तदनंतर मार्च १९३२ मध्ये गाइदिन्ल्यू आणि तिच्या सहकाऱ्यांनी आसाम रायफलसच्या हंग्रुम गावातील इंग्रजांच्या फौजेच्या संरक्षणासाठी लावलेल्या दुसऱ्या ठाण्यावर (आऊट पोस्ट) भाल्यांच्या साहाय्याने हल्ला केला. या काळात इंग्रज सरकारने तिला पकडण्याचे बरेच प्रयत्न केले. त्यासाठी सामदामदंडभेद नीतीचा वापर केला. गाइदिन्ल्यूला मदत करणाऱ्या दोन गावांत इंग्रजांनी प्रचंड जाळपोळदेखील केली, तरीही स्थानिक लोक तिला मनापासून साथ देत राहिले. आपल्या सहकारी क्रांतिकारींना आश्रय घेता येईल असा मोठा लाकडी किल्ला बांधत असतानाच १७ ऑक्टोबर १९३२ रोजी इंग्रजांनी अचानकपणे गाइदिन्ल्यू आणि तिच्या सहकाऱ्यांना अटक केली. या सर्वांना इंफाळला आणून त्यांच्यावर खटला भरण्यात आला. त्यावेळी सतरा वर्षांची असणाऱ्या गाइदिन्ल्यूला जन्मठेपेची, तर तिच्या काही सहकाऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. पुढे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १४ ऑक्टोबर १९४७ रोजी तिची सुटका करण्यात आली. आपले उर्वरित आयुष्य तिने नागा जमातीच्या प्रगतीसाठी वेचले. स्वातंत्र्यासाठी तिने लहान वयातच केलेल्या पराक्रमामुळे तिला 'नागालँडची राणी लक्ष्मीबाई म्हणून देखील ओळखले जाते. तिच्या अथक प्रयत्नांमुळे मणिपूरची स्वातंत्र्य चळवळ ही भारतीय स्वातंत्र्य चळवळीशी जोडली गेली. मणिपूरमधील लोकांमध्ये स्वातंत्र्याची ठिणगी पेटवण्यात तिचा मोलाचा वाटा आहे. अशा या राणी गाइदिन्ल्यूला तिच्या क्रांतिकार्यासाठी भारत सरकारतर्फे स्वातंत्र्यसेनानी ताम्रपत्र (१९७२), पद्म भूषण (१९८२), मानसन्मान देऊन गौरविण्यात आले. आपणा सर्वांना प्रेरणा देणाऱ्या अशा अनेक ज्ञात, अज्ञात विरांगना या देशात होऊन गेल्या. स्वातंत्र्य लढ्यातील अशा लोकांचे मौल्यवान योगदान समजून घ्यायला हवे. या लोकांच्या असीम बलिदानातून आपली आजची स्वातंत्र्याची इमारत उभी आहे. अशा लढाऊ योद्ध्यांना कोटी कोटी प्रणाम.

**जय हिंद**

**- किरण केंद्रे**
कार्यकारी संपादक



प्रा. राजा माळगी

# क्रांतिकन्या हौसाताई पाटील

ही कथा आहे एका क्रांतिकारक बापाच्या क्रांतिकारी मुलीची, तिचे नाव हौसाताई भगवान पाटील म्हणजेच पूर्वाश्रमीची हौसाताई नाना पाटील. भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्याला खूप महत्त्व आहे. कारण हा लढा निर्णायक होता. या लढ्यामध्ये त्या वेळच्या दक्षिण सातारा जिल्ह्यामध्ये प्रतिसरकार (पत्री सरकार) कार्यरत होते. या लढ्याचे नेतृत्व क्रांतिसिंह नाना पाटील करत होते. प्रतिसरकार

लोकाभिमुख असल्याने या सरकारला लोकाश्रय होता. या सरकारच्या माध्यमातून क्रांतिकारकांनी अनेक लढे लढले, त्यामुळे त्यांची दखल इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये घेण्यात आली होती.

हौसाताईंचा जन्म १२ फेब्रुवारी १९२६ साली सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील येडेमच्छिंद्र या गावी एका सधन पण वारकरी पाटील कुटुंबात झाला. हौसाताईच्या वयाच्या चौथ्या वर्षी त्यांच्या (आकुबाई) आईचे निधन झाले. आजारपण आणि गरिबीत त्यांचे बालपण गेले. वयाच्या चौदाव्या वर्षी म्हणजे १९४० मध्ये हणमंतवडिये ता. खानापूर येथील क्रांतिकारक नानासाहेब मोरे (पाटील) यांचे चिरंजीव भगवानराव पाटील यांच्याशी गांधी पद्धतीने त्यांचा विवाह झाला. त्यांचे सासरही क्रांतिकारी विचारांचे होते. सासर माहेरच्या क्रांतिकारी विचारांच्या संस्कारातून त्या आपसूकपणे चळवळीत सामील झाल्या. सुरुवातीला भूमिगत कार्यकर्त्यांना जेवण पोहोचवणे, निरोप देणे, खबर देणे अशी कामे त्या करत होत्या. त्या कामात त्यांच्या पतीनेही त्यांना साथ दिली.

१९४३ सालची गोष्ट, हौसाताई पाच महिन्यांच्या गरोदर होत्या. भूमिगतांची चळवळ ऐनभरात आली होती. इंग्रजांना जेरीस आणण्याचे तंत्र अवलंबले जात होते. कोर्ट कचेऱ्या, पोलीस ठाण्याचे कामकाज बंद पाडणे, शस्त्रास्त्रे पळवणे, सरकारी कार्यालये जाळणे असे कार्यक्रम आखले जात होते. त्याचाच एक भाग म्हणून खानापूर तालुक्यातील वांगी येथील सरकारी डाक बंगला जाळण्याचे ठरवले. हा कार्यक्रम करण्याआधी त्या डाक बंगल्याची माहिती काढण्याची जबाबदारी हौसाताईंवर सोपवली, त्यांच्याबरोबर कृष्णा साळुंखे हे साथीदार होते. दोघांनीही बाप, मुलीचे सोंग घेऊन दिवभर डाक बंगल्याजवळ बसून संपूर्ण माहिती मिळवली, आणि दुसऱ्या दिवशी क्रांतिकारकांनी वांगीचा डाकबंगला जाळला.

हौसाताई सात दिवसाच्या ओली बाळंतीण होत्या. त्या वेळी क्रांतिअग्रणी जी. डी. बापू यांनी भवानीनगर स्टेशनवरून रायफली पळवण्याचा बेत आखला, त्यासाठी त्यांनी एक नाटक रचले आणि त्यामध्ये हौसाताईंना सामावून घेतले. त्यामध्ये कृष्णा साळुंखे, धुळ्याचे उत्तमराव पाटील, पाऱ्याचे भगवानराव सूर्यवंशी होते. पोलिसांना फसवण्यासाठी या साऱ्यांनी भांडणांचे नाटक केले. त्यांचे हे भांडण पाहणाऱ्यांना खरे वाटले. आपली शस्त्रे टाकून पोलिस भांडण सोडवण्यासाठी पुढे आले आणि पाठीमागून भगवानराव दाजी यांनी रायफली पसार केल्या.

कराड-विटे रस्त्यावर सुर्ली घाटात टपालगाडी लुटण्याचे क्रांतिकारकांनी ठरवले. त्या जागेची रेकी (माहिती गोळा करून सांगणे) करण्याचे काम पुन्हा हौसाताई यांच्याकडे आले. त्यांच्याबरोबर त्यांचे पती भगवानराव पाटील, कॅप्टन रामभाऊ पवार, कृष्णा साळुंखे हे सहभागी झाले. घाटात जाऊन तेथील भौगोलिक रचना यांची माहिती घेतली. ताई आणि कृष्णा साळुंखे घाटाच्या खाली थांबले, घाटमाथ्यावर क्रांतिकारक होते. ताईंचे वडील बनून मुलीला सासरी सोडायला चाललो आहे असा बहाणा करून साळुंख्यांनी गाडीत प्रवेश मिळवला व पुरेसे संरक्षण यंत्रणा नाही याची माहिती इशाऱ्याद्वारा क्रांतिकारकांना दिली आणि क्रांतिकारकांनी ती टपालगाडी आणि त्यातील पैसे लुटले.

प्रतिसरकारच्या स्थापनेनंतर सुभाषबाबू यांच्या

आझाद हिंद सेनेच्या धर्तीवर तुफान सेनेची निर्मिती करण्यात आली. त्यासाठी शस्त्रे लागणार होती. गोव्याहून शस्त्रे आणण्याचे ठरले. जी. डी. बापू लाड या कामगिरीसाठी गोव्याला जाणार होते. त्यांच्याबरोबर जाण्यासाठी हौसाताईंची निवड करण्यात आली. त्या वेळी त्यांना एक वर्षाचा मुलगा होता. बाळाला घरी ठेवून बापूंबरोबर त्या गोव्याला गेल्या. तिथे शस्त्रे ताब्यात घेतली. पण उघडपणे शस्त्रे घेऊन येणे मुश्कील होते. त्यामुळे हमरस्ता सोडून तेथील कोळी लोकांच्या मदतीने जंगलातून त्या पायी मोहिम यशस्वी करत आपल्या मुक्कामी परतल्या.

गोव्याहून परत आल्यानंतर काही दिवसांतच बाळ जोशी म्हणून एक कार्यकर्ते जयसिंगराव माने यांच्या साथीने गोव्याला शस्त्रे आणण्यासाठी गेले. पण तिथे त्यांना पकडून पोर्तुगीजांनी त्यांना सेंट्रल जेलमध्ये ठेवले होते. क्रांतिकारकांनी त्यांना सोडवून आणण्याचा बेत आखला होता. या कामी पुन्हा एकदा जी.डी. बापू यांनी ताईंची निवड केली. त्या वेळी त्यांचे बाळ लहान होते. जायचे की नाही असे द्वंद्व त्यांच्या मनात सुरू होते. त्या वेळी नाना पाटील तिथेच होते. त्यांनी आपल्या मुलीने क्रांतिकारक बापाची मुलगी म्हणून निर्णय घ्यावा असे सुचवले. बाळाला आत्या आणि आजीच्या स्वाधीन करून त्या बापूंबरोबर गोव्याला निघाल्या.

सुटकेची योजना एका कागदावर लिहिली होती. तो कागद बाळ जोशींपर्यत पोहोच करावयाची जबाबदारी ताईंची होती. ताईंनी ती चिठ्ठी त्यांच्या लांबसडक केसाच्या अंबाड्यात लपवली. पोलिसांना त्याचा सुगावा लागला नाही. भेटीची परवानगी आधीच घेतली होती. ठरल्याप्रमाणे जोशींची बहीण होऊन त्यांना भेटण्यासाठी त्या तुरुंगात गेल्या. इकडचे तिकडचे बोलणे झाल्यावर पोलिसांची नजर चुकवून शिताफीने तो कागद जोशींना दिला. चिठ्ठीतील ठरलेल्या योजनेनुसार जोशी आणि माने यांनी तुरुंगातून पलायन केले. पोलिसांना संशय आला व शोध सुरू झाला. दिवसभर पणजीमध्ये बसून रात्री निघायचे ठरवले. मध्ये मांडवी नदी आहे. ती पार करावयाची होती. स्थानिक कोळी लोक मदतीला होते. ताईंना उत्तम पोहता येत असल्याने त्यांनी थेट मांडवी नदीत उडी मारली आणि भले मोठे पात्र पोहून पलीकडचा तीर गाठला. काठावरील एका झोपडीत कपडे बदलून जंगलातून मार्ग काढत चालत परतीच्या प्रवासाला लागल्या. जंगलातील जळूंवर मोठ्या धाडसाने मात करत मजल – दरमजल करत आठव्या दिवशी बेळगावमार्गे किर्लोस्करवाडी आणि तेथून आपल्या गावी परतल्या.

हौसाताई विलक्षण व्यक्तिमत्त्वाच्या रणरागिणी होत्या. भीती नावाची गोष्ट त्यांना स्पर्श करत नव्हती. आपण एका क्रांतिकारकाची मुलगी आहोत याचे भान त्यांना सदैव होते. त्यामुळे कशाचीही तमा न बाळगता त्या स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाल्या. स्वातंत्र्यानंतर शांत न बसता त्या हैद्राबाद मुक्ती संग्राम, गोवामुक्ती संग्राम आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभागी झाल्या, पुढेही आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत सत्यशोधकी विचाराने जगल्या. अनेक सामाजिक चळवळींत त्या सहभागी होत राहिल्या. अशा महान क्रांतिकारी हौसाताईंचे वयाच्या ९६व्या वर्षी वृद्धापकाळाने कराड येथील कृष्णा हॉस्पिटल मध्ये २३ सप्टेंबर २०२१ रोजी निधन झाले, आणि एक झंझावात शांत झाला.

**संपर्क : ९४२१७११३६७**



# झेंडा तिरंगी

■ शंकर विटणकर

तिरंगी आमुचा झेंडा छान
भारत देशाचा अभिमान || धृ ||

उंच फडकतो मानाने
आत्मबलाच्या तेजाने
सूर्या जैसी त्याची शान
तिरंगी आमुचा झेंडा छान

शहिदांच्या बलिदानाने
सत्य–अहिंसा मार्गाने
मिळविले स्वातंत्र्या महान
तिरंगी आमुचा झेंडा छान

तीन रंग – चक्रही त्यावर
ध्येय कधी अमुचे सुंदर,
प्रेम – सत्य–शांती–बलिदान
तिरंगी आमुचा झेंडा छान

धनिक–श्रमिक– आदिवासी
न्याय एक सकलांसाठी
समान सर्वा संविधान
तिरंगी आमुचा झेंडा छान

दु:ख व्यथितांचे जाणी.
भेद न जातींचे मानी
देई सर्व धर्मांना सन्मान
तिरंगी आमुचा झेंडा छान

ज्ञान इथे विज्ञान महा
शूर–वीरांची खाण हा
बलाढ्य देशा तुला प्रणाम
तिरंगी आमुचा झेंडा छान

रक्षण करण्या देशाचे
प्राणाही सिद्ध सदा अमुचे
जग कल्याणा गाई गान
तिरंगी आमुचा झेंडा छान

संपर्क : ९८६००२४६२९

# युआन श्वांग

प्रशांत सरुडकर

भारताला भेट देणाऱ्या अनेक प्रवाशांनी प्रवास वर्णने लिहिली. यामुळे त्या त्या काळातील इतिहास आपणांला माहीत झाला. युआन श्वांग म्हणजेच 'ह्युएनत्संग' हे चीनचे नागरिक. बौद्ध धर्माच्या अभ्यासासाठी त्यांनी भारताचा प्रवास केला. त्यावर प्रवास वर्णने लिहिली. यामुळे प्राचीन भारतातील अनेक गोष्टींची माहिती आपणाला झाली.

चीनमधील हेनान प्रदेशातील लोयांग शहराच्या जवळ असलेल्या एका छोट्या खेड्यात युआन यांचा जन्म झाला. त्यांचा जन्म इ.स. ६०० मध्ये झाला. त्यांच्या कुटुंबामध्ये बौद्ध धर्माविषयी एक प्रकारचे आकर्षण होते. त्यांचा मोठा भाऊ बौद्ध भिक्खू बनला आणि या गोष्टीचा प्रभाव युआनवर पडला. लहानपणापासूनच गौतम बुद्धांविषयी त्यांना आकर्षण निर्माण झाले. वयाच्या १३ व्या वर्षी पंचशीलाचा स्वीकार करून ते श्रामणेर बनले. गौतम बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर १००० वर्षांनी युआनचा कालखंड येतो. या काळापर्यंत चीनमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार झाला होता. त्या काळात प्रसिद्ध असलेल्या रेशीम मार्गाने बौद्ध धर्म व तत्त्वज्ञान चीनपर्यंत पोहोचले. इ.स. ३९९ मध्ये फाहियान या प्रवाशाने असाच भारताचा प्रवास केला होता. त्याचप्रमाणे चि-येन या प्रवाशानेही भारताचा प्रवास केला होता. भारत व चीनमध्ये मोठ्या प्रमाणात व्यापार असल्यामुळे बौद्ध तत्त्वज्ञान त्यांच्यामार्फतही चीनमध्ये जाऊन पोहोचले. युआन श्वांग यांनी चीनमध्ये ज्या वेळेला सुरुवातीच्या काळात बौद्ध तत्त्वज्ञानाचा अभ्यास करायला सुरुवात केली, त्या वेळी त्याला यामध्ये मतमतांतरे दिसून आली. बौद्ध तत्त्वज्ञानाचा मुळापासून अभ्यास करावा, अशी इच्छा त्याच्या मनात निर्माण झाली व भारतात येण्याचा त्याने निर्णय घेतला. त्याच्या प्रवासाला चीनमधील चांगानमधून सुरुवात झाली. परत चीनला जाईपर्यंत त्याचा कालखंड होता १७ वर्षांचा. कधी घोड्यावर तर बऱ्याच वेळा पायी, असा त्याने सुमारे २५००० कि.मी. चा प्रवास केला. अनेक खडतर रस्ते, काही पर्वताच्या रांगा त्याच्यामध्ये तियान शान, हिंदूकुश, खैबर खिंड असे प्रदेश होते. अनेक नद्या त्याने ओलांडल्या. भीषण वाळवंटातून प्रवास केला. अनेक संकटांना तोंड दिले. या सर्वांच्यापाठी एकच उद्देश होता, केवळ ज्ञानप्राप्ती.

चांगान येथून निघाल्यानंतर युआन गोबीच्या वाळवंटात आले. मंगोलियाच्या जवळ असणारा हा प्रदेश अतिशय



भीषण होता. अतिशय विषम हवामानातून त्यांना प्रवास करावा लागला. युआन श्वांग यांना प्रवासात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. वाळवंटातून प्रवास करीत असताना त्यांच्या जवळची पाण्याची पिशवी पडली आणि सर्व पाणी सांडून गेले. सुमारे ५०० कि.मी. जाईपर्यंत पुरेल इतके पाणी त्यांच्या पिशवीत होते. सूर्याची प्रखर उष्णता आणि अंगाची लाही लाही करणारे वाळवंट अशा स्थितीत थेंबभरही पाणी जवळ नाही. शरीरातील पाणी संपले आणि ते बेशुद्ध पडले. पाच दिवस त्यांना पाण्याचा एक थेंबही मिळाला नाही. पण पाचव्या दिवशी वातावरण बदलले. खूप थंडी पडली. हिमवर्षाव झाला. यामुळे ते ताजेतवाने झाले व पुढील प्रवासासाठी ते बाहेर पडले. पुढे ते ताश्कंदला आले. पुढे त्यांनी आमुदर्या नदी ओलांडली व बाल्ख येथे ते पोहोचले. नंतर मजल दरमजल करत खैबर खिंडीतून ते पेशावरला आले. तक्षशिला या ठिकाणी काही काळ ते राहिले. पुन्हा चिनाब नदी ओलांडून ते जयपूर येथे पोहोचले. पुढे ते कुल्लूघाटी, मथुरा, प्रयाग, कौशांबी, कुशीनगर, सारनाथ, राजगीर, उडिसा असा प्रवास करत नालंदा या परिसरात आले. त्या काळात नालंदा विद्यापीठ जगप्रसिद्ध होते. २०,००० पेक्षा जास्त विद्वान प्राध्यापक या ठिकाणी ज्ञानदानाचे काम करत होते. या विद्यापीठात तीन ग्रंथालये होती. भव्य ग्रंथालय आणि ज्ञानाविषयी आसक्ती असणाऱ्या विद्यार्थ्यांचा वर्ग यांनी हा परिसर फुललेला असायचा. त्यापैकी एक ग्रंथालय ९ मजली होते. आजही नालंदा विद्यापीठाचे अवशेष पाहिल्यानंतर त्याच्या भव्यतेची जाणीव आपणाला होते. या ठिकाणी युआन श्वांग काही काळ राहिले. बौद्ध तत्त्वज्ञानाविषयी त्यांना आवश्यक असणारे महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांनी अभ्यासले. तिथून ते कामरूप म्हणजे आजचे आसाम या ठिकाणी गेले. पुढे ते प्रयागला आले. शिलादित्यांनी त्या ठिकाणी एक पंचवार्षिक परिषद आयोजित केली होती. ही परिषद संपल्यानंतर त्यांचा परतीचा प्रवास सुरू झाला. भारतामध्ये प्रवास करत असताना अनेक प्रांत, राज्ये यातून ते फिरले. अनेक राजांशी त्यांचा परिचय झाला. अनेक परिषदांमध्ये त्यांनी भाषणे केली. भारतातील बौद्ध धर्माचा जवळून अभ्यास केला. तसेच, याबरोबर काही वैदिक ग्रंथही त्यांनी अभ्यासले. चीनवरून निघण्यापूर्वीच त्यांनी पाली आणि संस्कृत भाषा अभ्यासल्या होत्या. त्यामुळे भारतामध्ये फिरताना लोकांशी ते सहज संवाद करू शकले. त्यांच्या ज्ञानाविषयी असणाऱ्या आसक्तीमुळे अनेक ठिकाणी त्यांचा मोठा मानसन्मान झाला. चीनला परतल्यानंतर तेथील सम्राटाने त्यांना अधिकाराचे पद देऊ केले. परंतु त्यांनी ते नाकारले. आणलेल्या ग्रंथांचे भाषांतर, संपादन आणि ग्रंथ प्रती तयार करण्यासाठी त्यांनी राजाकडे मदत मागितली. इ.स. ६४८ मध्ये त्यांनी आपले प्रवास वर्णन पूर्ण केले. बौद्ध तत्वज्ञानाविषयी असणाऱ्या असीम निष्ठेमुळे त्यांनी इ.स. ६४९ मध्ये एक विहार बांधला. या विहारात ते दररोज ४ तास पवित्र ग्रंथाचे प्रवचन लोकांना सांगत. दररोज सुमारे १०० पेक्षा जास्त शिष्य त्यांची व्याख्याने ऐकण्यासाठी येत. जवळच्या शाळेमध्ये ज्ञानदानाचे कामही त्यांनी काही काळ केले.

भारतामधून परत जाताना जे ग्रंथ त्यांनी बरोबर घेतले होते. त्यांचा योग्य सन्मान झाला पाहिजे. कारण ते बौद्ध तत्त्वज्ञानाचे ग्रंथ आहेत. हा विचार त्यांनी इथून जातानाच केला होता. हे ग्रंथ ठेवण्यासाठी इ.स. ६५२ मध्ये त्यांनी एक भव्य सात मजली पॅगोडा निर्माण केला. त्याची उंची १८० फुट होती. जगाला शांततेचे तत्वज्ञान शिकवणाऱ्या या ग्रंथांना ठेवण्यासाठी त्याच प्रकारची वास्तू असावी या भावनेने भव्य असा पॅगोडा त्यांनी निर्माण केला. सुमारे ६५७ ग्रंथांची हस्तलिखिते त्यांनी सोबत घेतली होती. ती सर्व या पॅगोड्यात ठेवली व आपले उर्वरित आयुष्य या ग्रंथांचे चीनी भाषेत भाषांतर करण्यात खर्च केले. ग्रंथ ठेवण्यासाठी भव्य इमारत उभी करावी. ही घटनाच त्यांच्या स्वप्नांची भरारी किती उंच होती याची जाणीव आपणाला करून देते. बऱ्याचदा सोबत असणाऱ्या वाटाड्यांनी त्यांना पश्चिमेकडचा प्रवास करू नये, भारतात जाऊ नये असा सल्ला दिला. पण ते दृढनिश्चयी होते. गौतम बुद्धांची प्रत्यक्ष ठिकाणे आपणाला पाहता आली तर आपले जीवन धन्य होईल असा विचार त्यांच्या मनात होता. "संकटांनी माझ्या शरीराचे धुळीच्या कणांइतके लहान तुकडे केले तरी चालेल. पण मी माझे उद्दिष्ट पूर्ण झाल्याशिवाय कधीच माघारी फिरणार नाही." अशी शपथ त्यांनी घेतली आणि ती दृढनिश्चयाने पूर्णही करून दाखवली.

**संपर्क : ८३२९५६२९९१**



श्रीकांत बोजेवार

# रामभरोसे थापाड्या

भाग २

राम्याला आता थापा मारण्यात मजा वाटू लागली होती. त्याला हा छंदच जडला. जरासं कुठं काही ऐकलं की दोनाचे तीन करायचे आणि त्याला भलतंच काही तरी जोडायचं. 'कुणाचं काही नुकसान होत नाही आणि आपल्यालाही मज्जा येते. मग काय हरकत आहे थापा मारायला? आणि सगळ्यांना उत्सुकता वाटेल अशी थाप मारणं काय सोप्पं आहे?' असं राम्या स्वतःच स्वतःला सांगत होता. पण अखेर थापा त्या थापाच ना?



# बेभरवशा रामभरोसे

पापांचा घडा कधी तरी भरतोच असं म्हणतात ना? म्हणजे मग थापांचाही? कधी तरी भरणारच!


आपल्या राज्यातल्या एका तळ्यात खूप कमळं फुलली आणि त्या तळ्यात मध्यरात्री मत्स्यकन्या अवतरली होती, ही राम्यानं मारलेली थाप कानोकानी प्रवास करत करत राजपुत्र धर्मानंद याच्यापर्यंत पोहोचली. राजपुत्र तरुण होता, पराक्रमी होता आणि अतिशय देखणा होता. आपल्याला विवाहासाठी योग्य अशी राजकन्या मिळत नाही म्हणून तो हिरमुसला होता. तळ्यात मत्स्यकन्या दिसल्याचं त्याच्या कानावर गेलं आणि आपण तिच्याशीच लग्न करणार असा हट्ट त्यानं धरला. राजमहालात आवारात मत्स्यकन्येसाठी भले मोठे तळे बांधण्याचा आदेश त्याने दिला. मत्स्यकन्येला कमळांच्या तळ्यात राहायला आवडते असं वाटल्यामुळे त्या तळ्यात कमळांच्या वेली लावण्याचा आदेशही त्याने दिला. तळ्याचे बांधकाम सुरू झाले आणि मत्स्यकन्या कुणाला दिसली होती, याचा शोध सुरू झाला. कानोकानी पसरलेल्या बातमीच्या वेध घेत घेत अखेर राजपुत्राचे गुप्तहेर राम्यापर्यंत पोहोचले. राम्याला राजहालात घेऊन जाण्यासाठी पालखी आली. राम्याला कळेना की आपण असा काय पराक्रम केला. परंतु पालखी आल्यामुळे तो खूश झाला. आपलं काम आपण चोख करतो हे पाहून राजपुत्र धर्मानंद यानं कदाचित आपल्याला इनाम द्यायचं ठरवलं असेल, एखादी पदवी देऊन आपला गौरव करायचा असेल अशी स्वप्नं तो पाहू लागला. राजाची आपल्यावर मर्जी आहेच, आता राजपुत्रही आपल्या प्रभावाखाली येत असल्याचं पाहून रामभरोसेचा आनंद ओसंडून वाहू लागला.

राजपुत्रानं रामभरोसेचं चांगलं आगतस्वागत केलं. मधुर फळे आणि उत्तम प्रतीचा मध त्याला चाखायला त्याच्यासमोर ठेवला. राजपुत्राने एक पोपट पाळलेला होता. तो फक्त गोड आणि स्वादिष्ट फळांनाच चोच लावत असे, आणि त्याने चोच लावलेली फळेच राजपुत्र खात असे. आपल्या या खास पोपटानं निवडलेली फळं राजपुत्रानं रामभरोसेला चाखायला दिली होती. हा पाहुणचार आणि स्वागत पाहून राम्याचे हात जणू स्वर्गालाच टेकले. परंतु पाहुणचार झाल्यावर राजपुत्रानं केलेली मागणी पाहून रामभरोसेची बोबडी वळली. रामभरोसेला आदराने आसनावर बसवून राजपुत्र धर्मानंद म्हणाला, "आपण भाग्यवान आहात, आपल्याला मत्स्यकन्या दिसली. मला मिळालेल्या माहितीनुसार मत्स्यकन्या काही ठरावीक लोकांनाच दर्शन देत असतात. माझी तुम्हांला विनंती आहे की तुम्ही त्या तळ्यातील मत्स्यकन्येशी संपर्क साधा, तुम्हांला ती पुन्हा दर्शन देईलच. तिला सांगा की राजपुत्राला तिच्याशी विवाह करायचा आहे. मी तिच्यासाठी खास तळं बांधलं आहे. ज्या तळ्यात ती सध्या राहते, तिथलं कमळं कधीतरीच फुलतात. राजमहालातील तळ्यात मी अशी कमळं लावलेली आहेत जी बाराही महिने फुललेली असतील."

राजपुत्राचा एक एक शब्द रामभरोसेच्या मनात भीतीची धडकी भरवून गेला. त्याची छाती भीतीने धपापू लागली.

राजपुत्र म्हणाला, "निश्चितच तुमची ही अवस्था, त्या मत्स्यकन्येचं अपार सौंदर्य आठवल्यानं झाली असणार. तुम्ही केलेल्या तिच्या वर्णनामुळे मीही तिच्यावर मोहित झालो आहे. कधी एकदा तिच्याशी विवाह करतो असं मला झालं आहे."

आता रामभरोसेला रोज रात्री उशिरा तळ्यावर जाऊन बसणं भाग झालं. तो रात्री उशिरा तळ्याकाठी बसे आणि पहाटे उजाडलं की घरी परत येई. त्याच्या झोपेचं पार खोबरं झालं. रोज सकाळी राजपुत्र धर्मानंद याचा दूत



घरी येई आणि "मत्स्यकन्या दिसली का तुम्हांला?" असा प्रश्न विचारून जाई. हे नाटक काही फार काळ चालणार नाही. आपल्याला खरं काय ते सांगावं लागेल आणि ते सांगितलं की राजपुत्र भर चौकात आपलं मुंडकं उडवायलाही कमी करणार नाही, हे राम्याला माहीत होतं. त्याची आई कपाळावर हात मारून घेत रडू लागली, आणि "तुला म्हटलं होतं ना आता शहाण्यासारखा राहा, पण नाही ऐकलं तू." असं म्हणत दोष देऊ लागली. गावातील महादेवाच्या मंदिराचा पुजारी रोज सूर्योदयापूर्वी तळ्यात अंघोळ करायला येत असे. तळ्याकाठी चिंतामग्न अवस्थेत बसलेल्या राम्याला पाहून तो पुजारी एक दिवस त्याच्याकडे आला आणि म्हणाला, "तुझ्या मनातली चिंता मला माहीत आहे. तुझ्या ज्या सवयीमुळे ही वेळ आली ती सवय सोडण्याची महादेवापुढे शपथ घे. मी तुला सुटकेचा मार्ग सांगतो." राम्यानं पुजाऱ्याचे पाय धरले आणि म्हणाला, "मी आईचं ऐकलं नाही म्हणून ही वेळ आली. मी आता खरंच कधीही अशा थापा मारणार नाही. तुम्ही कृपा करून मला मदत करा."

पुजाऱ्याच्या म्हणण्याप्रमाणे राम्यानं तळ्यात आंघोळ करून महादेवापुढे शपथ घेतली. मग पुजाऱ्यानं त्याला आपल्या समोर बसवलं आणि सुटकेचा मार्ग सांगितला. मार्ग सांगून झाल्यावर तो राम्याला म्हणाला, "आता तुझी अक्कल वापर आणि हे सगळं कसं जमवून आणायचं ते बघ."


बहुधा जमिनीखालील जलप्रवाहातून मत्स्यकन्या इतरत्र निघून गेली असावी, मी तिचा शोध घेतो असा निरोप राम्यानं राजपुत्राला पाठवला. आईच्या पाया पडून आणि लोहाराकडून त्याचा घोडा उसना घेऊन राम्या निघाला. मजल दरमजल करत तो शेजारच्या छोट्या राज्यात पोहोचला. आपण एक प्रवासी असून भटकंती करत इथवर पोहोचलो आहोत, राजाचं दर्शन घेण्याची इच्छा आहे, असं त्यानं पहारेकऱ्यांना सांगितलं. एक भटका प्रवासी आपल्या दारात आल्याचं पाहून राजानं त्याला सन्मानानं आत बोलावलं. त्याच्या भोजनाची व्यवस्था केली आणि प्रवासातून कळलेल्या काही शहाणपणाच्या गोष्टी, मनोरंजक माहिती सांगण्याची विनंती केली. महाराणी लीलावती आणि राजकन्या सुकेशाही उत्सुकतेनं त्या गप्पा ऐकायला आल्या. राजकन्या सुकेशा हिला पाहताच रामभरोसे म्हणाला, "अहाहा काय लावण्यवती आहे, तुमची कन्या. हिचा विवाह शेजारच्या राज्यातील राजपुत्र धर्मानंद याच्याशीच व्हायला हवा." ते ऐकताच सुकेशा लाजली. महाराणी लीलावती म्हणाल्या, "प्रिय अतिथी, तुम्ही अगदी तिच्या मनातलं बोललात. पण हे कसं शक्य आहे? राजपुत्र धर्मानंद कुठल्या तरी मत्स्यकन्येच्या प्रेमात पडलाय असं ऐकलं आहे आम्ही." जरा विचार करून रामभरोसे म्हणाला, "एक उपाय आहे, परंतु त्यात थोडी जोखीमही आहे." राजकन्या सुकेशा आतुरतेनं म्हणाली, "मी ती जोखीम पत्करायला तयार आहे." मग राम्यानं आपली योजना तिला सांगितली.

राम्या आपल्या गावात परत आला आणि राजपुत्राला भेटला. येत्या पौर्णिमेला, पूर्ण चंद्राच्या प्रकाशात ती मत्स्यकन्या या तळ्यात पुन्हा येणार आहे. मी तळ्याच्या काठावर बसेन, तुम्ही लपून तिला पहा. ठरल्याप्रमाणे राजपुत्र एका झाडाआड लपून बसला. मध्यरात्री नंतर ते विस्तीर्ण तळे चंद्रप्रकाशात न्हालेले असताना अद्‌वितीय सुंदरी असलेली राजकन्या सुकेशा कमरेखाली मासोळीच्या आकाराची वस्त्रे परिधान करून ठरल्याप्रमाणे तळ्याच्या दुसऱ्या काठाने हळूच उतरली आणि जलक्रीडा करत करत राजपुत्र धर्मानंद आणि राम्या होते, त्या बाजूला आली. मत्स्यकन्येचे ते सौंदर्य पाहून राजपुत्र लुब्ध झाला, क्षणभर त्याचे भान हरपले आणि स्वतःच्याही नकळत तो झाडाच्या मागून पुढे आला. त्याला पाहून मत्स्यकन्या बावरली आणि निघून जाऊ लागली. राजपुत्राने तिची विनवणी केली, तिच्या सौंदर्याची प्रशंसा केली, आपले प्रेम व्यक्त केले आणि मग तिला आपल्याशी विवाह करण्याची विनंती केली.

मत्स्यकन्या म्हणाली, "तू राजपुत्र असूनही नम्र आहेस, परंतु मला या अवतारात तुझ्याशी विवाह करता येणार नाही. मला मानवी अवतार धारण करावा लागेल." राजपुत्र म्हणाला, "मग तर फारच छान होईल, तू कृपया माझ्या प्रेमाचा स्वीकार कर आणि मानवी अवतार धारण कर." मत्स्यकन्या म्हणाली, "शेजारच्या राज्यातील राजाची कन्या आहे सुकेशा, मी दोन दिवसांत, माझं सगळं सौंदर्य तिला बहाल करते, तिच्यात प्रवेश करते."

मत्स्यकन्येने एवढं सांगून निरोप घेतला. राजपुत्र धर्मानंदानं अत्यानंदानं राम्याला मिठी मारली आणि म्हणाला, "आमच्या विवाहाच्या वेळी तुला खास पाहुणा म्हणून निमंत्रण असेल." राजपुत्र जाताच पुजारी अंघोळीसाठी आला आणि म्हणाला, "पुन्हा जर थाप मारलीस तर मी माफ करणार नाही." राम्या पुजाऱ्याच्या पाया पडायला वाकला तेंव्हा त्याच्या पाठीत एक जोरदार धपाटा बसला आणि त्याच्या आईचा आवाज आला, "अजिबात माफ करू नका याला, चांगले चार दणके द्या. सारखा सारखा शपथा घेतो आणि शपथा मोडतो." राम्यानं स्वतःचे कान धरले ते घरी पोहोचेपर्यंत सोडलेच नाहीत !

**संपर्क : ९८९२४१९२६७**



# हुतात्मा नाग्या कातकरी

श्रीनिवास गडकरी

२५ सप्टेंबर १९३०, रायगड म्हणजे त्या वेळच्या कुलाबा जिल्ह्यातील चिरनेर या आडवळणाच्या गावाजवळचे जंगल तिथे खूप मोठ्या संख्येने स्वातंत्र्यवीर गोळा झाले होते.

त्यांना ब्रिटीश सरकारविरुद्ध सत्याग्रह करायचा होता. महात्मा गांधीजींचा आदेशच होता तसा. गांधीजींनी गुजरातमधील दांडी येथे मिठाचा सत्याग्रह केला. मूठभर मीठ उचलले पण बलाढ्य ब्रिटीश सत्तेला हादरा बसला. पार हळबडून गेले ते. या मिठाच्या सत्याग्रहाला देशभर जनतेकडून जोरदार प्रतिसाद मिळाला. मुंबई, कलकत्ता, मद्रास, चेन्नई, त्रिवेंद्रम कांडला इथे तशाच प्रकारचे सत्याग्रह झाले. त्यात देशातील स्त्री-पुरुष खूप मोठ्या संख्येने सामील झाले. पण आपल्या देशाला सर्वत्र समुद्रकिनारा नाही. मग जिथे समुद्र किनारा नाही तिथे स्वातंत्र्यवीरांनी जंगलचा सत्याग्रह केला. जंगलावर हक्क ब्रिटीश सरकारचा नसून भूमिपुत्र म्हणून आम्हां भारतीय नागरिकांचा आहे असे या सत्याग्रहींचे म्हणणे होते. ब्रिटीशांची सत्ताच आम्ही मानत नाही मग त्यांचे कायदे कानून पाळण्याचा प्रश्नच कुठे येतो असं त्या सत्याग्रहींचे म्हणणे होते.

चिरनेर इथे गोळा झालेले हे सारे वीर त्याच स्वातंत्र्य भावनेने प्रेरित होते. भल्या पहाटे निघून खूप दूरवरच्या गावांतून व आदिवासी पाड्यांतून ते चालत इथे आले होते. सगळ्यांच्या मुखात 'भारत माता की जय', 'महात्मा गांधीचा विजय असो', 'वंदे मातरम'चा जयघोष होता. स्वातंत्र्याचा त्यांचा निर्धार पक्का होता. प्रत्येकाच्या हातात कोयता नाहीतर कुऱ्हाड असे काही ना काही हत्यार होतेच. अनेकांच्या मुखातून निघणाऱ्या देशभक्तीपर गीतांनी परिसर भारावून गेला होता. स्त्रिया व मुलेही यात मोठ्या संख्येने सामील होती. सूर्य आता वर आला होता.

अर्थात ब्रिटीश शासनही काही स्वस्थ बसून नव्हते. खूप मोठे पोलिसबळ व फौजफाटा घेऊन ब्रिटीश अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांच्याकडे घोडे, लाठ्या, काठ्या हे तर होतेच पण दमदार बंदुकाही होत्या. प्रथम ब्रिटीश अधिकाऱ्यांनी सत्याग्रहींना समजावून सांगितले. कायदा-कानून व नियमांची माहिती दिली. कायदेभंगाच्या परिणामांची कल्पना दिली. पण त्याचा कोणताच परिणाम जमलेल्या स्वातंत्र्यवीरांवर झाला नाही. त्यांचा निर्धार पक्का होता.

एका क्षणी सारे जण पुढे सरसावली व पुन्हा एकदा देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमला. प्रत्येकाने आपापल्या हातातील शस्त्राने समोरच्या सैनिकावर आक्रमण करायला सुरुवात केली. ब्रिटीश अधिकारी दिङ्मूढ होऊन ते सारं पाहत होता. प्रत्यक्ष ब्रिटीश साम्राज्याशी विद्रोह? ज्यांच्या साम्राज्यावर कधीही सूर्य मावळत नाही त्यांना आव्हान. तो ब्रिटीश अधिकारी चवताळून उठला. बंदोबस्तासाठी फौजफाटा त्यांनी आणला होता त्यात मामलेदार जोशीही होते. त्यांच्या हातात हे सारं होतं. तो संतापून मामलेदारांवर ओरडत, "अहो बघताय काय... या साऱ्यांवर गोळ्या झाडायचा हुकूम द्या." असे म्हणाला. मामलेदार अग्रभागी होते.

पण इथेच पंचाईत झाली. मामलेदार जरी सरकारी अधिकारी होते तरी ते स्वातंत्र्यप्रेमी होते. स्वातंत्र्यवीरांबद्दल त्यांच्या मनात सहानुभूती होती. असा हिंसाचार घडवून ही चळवळ दडपून टाकावी असे त्यांना मनातून बिलकूल वाटत नव्हते. त्यांनी गोळीबाराच्या आदेशाला सपशेल नकार दिला. आता मात्र त्या ब्रिटीश अधिकाऱ्याच्या तळपायाची आग मस्तकात गेली. त्याचा संताप

संताप झाला. त्याने सरळ कमरेचे पिस्तूल काढले आणि मामलेदारांवर गोळ्या झाडल्या. ते रक्ताच्या थारोळ्यात खाली पडले.

हा प्रकार पाहून जमा झालेले स्त्री–पुरुष चवताळून उठले. ते त्या ब्रिटीश अधिकाऱ्यांवर व पोलिसांवर चाल करून गेले. आता मात्र युद्ध परिस्थिती उभी राहिली. मगापासून लाठ्या– काठ्याने सत्याग्रहींना झोडपणाऱ्या व मागे खेचणाऱ्या पोलिसांना त्वरीत गोळीबाराचे आदेश मिळाले. अंदाधुंद गोळीबार झाला, आता मात्र सत्याग्रही जीव वाचवण्यासाठी सैरावैरा धावू लागले. पण पोलिसांच्या गोळ्यांचा वेध अनेकांच्या वर्मी लागला. अनेक जण रक्तबंबाळ होऊन रस्त्यात कोसळले. जालियन वाला बाग हत्याकांडाचीच पुनरावृत्ती झाली. एकूण बारा जण हुतात्मा झाले. खेरीज अनेक जण जखमी व जायबंदी झाले. परिसरातील नागरिक त्या आक्कादेवीच्या माळरानावर गोळा झाले. त्यांच्यात अजून जीव आहे अशा जखमींना पुढील उपचारासाठी हलवले गेले. शहिदांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. सारा परिसर शोकसागरात बुडून गेला.


या बारा हुतात्म्यांमधे एक होता नाग्या महादू कातकरी. हा केवळ २१ वर्षांचा तरुण. त्याच्या घरी एक वर्षांचा मुलगा, पत्नी व आई–वडील होते. खूप उशीराने त्यांच्या वडलांना ही बातमी समजली. ते त्वरेने घटनास्थळी दाखल झाले पण सारे काही संपले होते. त्यांचा मुलगा देशासाठी शहीद झाला होता.

पण, या हुतात्म्यांचे आश्चर्य इथेच संपत नाही. अनेक वर्षे इतिहासाचा हा तुकडा लोकांपासून अंधारातच राहिला. पुढे मग बऱ्याच अवधीने हा इतिहास लोकांसमोर मांडला गेला. त्या तेजस्वी हुतात्म्यांचे स्मारक उभारले गेले. मुलांनो तुम्ही कधी मुंबई किंवा पनवेल (नवी मुंबई) इथे गेलात तर या उरण तालुक्यातील चिरनेर या गावाला व तेथील हुतात्मा स्मारकाला जरूर भेट द्या. त्या तेजस्वी हुतात्म्यांचे स्मरण करा. त्या बारा शौर्यवान हुतात्म्यांना वंदन करा.

**संपर्क : ७७०९८८११९५**

## चिंटू

चारूहास पंडित/ प्रभाकर वाडेकर



# प्रिय आमचा देश...

■ सतीश खरात

*प्रिय आमचा देश आम्हांला,*
*प्रिय आमचा देश.*

*शिरावरी जणू मुकुट शोभला*
*उंच हिमालय गगना भिडला,*
*गंगा-यमुना नद्या वाहती*
*अथांग जलाशय तिन्ही बाजूंना.*
*सुजलाम् सुफलाम् मंत्र आमचा, पवित्रसा संदेश.*
*प्रिय आमचा देश....*

*अनेक भाषा, अनेक वेशभूषा*
*रंग वेगळे, गंध वेगळे,*
*तळहातावरी प्राण ठेवूनी*
*देशासाठी लढतो सगळे.*
*असोत भिन्न जरी आमच्या जाती,*
*नाही कुणाचा द्‌वेष.*
*प्रिय आमचा देश....*

*सप्तरंग हे इंद्रधनूचे*
*शिकवण देती समान सारे,*
*मानवतेचे गीत आमचे*
*सांगत सुटले इथले वारे.*
*जय भारत, जय भारत,*
*उरात भरतो नवा आवेश.*
*प्रिय आमचा देश..*

*संपर्क : ९४०४३७५८६९*



# गोष्ट खाज्या नाईकची

नरेंद्र दाभाडे

बालमित्रांनो, तुम्ही स्वतंत्र भारतात जन्माला आलात म्हणून तुम्हांला पारतंत्र्य काळात भारतीय लोकांना किती त्रास होता हे तितकेसे माहीत नाही. हे इंग्रज भारतीय लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे राबवत. जबरदस्तीने कर वसूल करत. कुटील कारस्थाने करून संस्थाने बळकावत व येथील संपत्ती हळूहळू त्यांच्या देशात नेत. पुन्हा त्यांच्याविरुद्ध कोणाला तक्रार करायची सोय नव्हती. कारण तक्रार ज्यांच्याजवळ करायची ते अधिकारीही इंग्रजच असत.

असाच एक इंग्रज अधिकारी होता, रॉबर्ट एडवर्ड हे नाव होतं त्याचं, तो सातपुडा डोंगर परिसरात अधिकार गाजवत होता. लष्करातून निवृत्त झाल्यावर त्याची ह्या भागात अधिकारी पदावर नेमणूक झाली होती. दुर्गम डोंगर भागात रहावे लागत असल्यामुळे आपला राग तो स्थानिक गरीब आदिवासी लोकांवर काढत असे. त्याने युद्धात अनेक माणसे मरताना पाहिलेली असल्याने त्याची वृत्ती अगदी निर्दयी झाली होती. गरीब लोकांना त्रास देताना त्याला आसुरी आनंद होत असे. त्याच्या जुलमी जाचामुळे अनेक गरीब लोकांना आपली घरेदारे सोडून जंगलाचा आश्रय घ्यावा लागे. पण हा कर्दनकाळ तेथेही त्यांचा पिच्छा सोडत नसे. ह्या भागातील लोकांना त्याने सळो की पळो करून सोडले होते म्हणा ना!

रॉबर्टला त्रासून ज्यांनी घरे सोडली होती त्यात होता एक भिल्ल तरुण. त्याचे नाव होते खाज्या नाईक. पण इतरांसारखा तो चूप बसून राहिला नाही. त्याने आपल्यासारखेच तरुण जमवले. त्यांची टोळी तयार केली आणि सातपुडा डोंगराचा आश्रय घेऊन इंग्रजांवर गनिमी हल्ले सुरू केले. सुरुवातीला इंग्रजांनी त्याची दखल घेतली नाही. पण जसजसे खाज्या नाईकाचा त्रास जास्त होऊ लागला तेव्हा मात्र त्याला पकडण्यासाठी त्यांनी डोंगरात अनेक मोहिमा काढल्या. पण खाज्या नाईक काही त्यांना दाद देत नसे. दर वेळी तो इंग्रज पोलिसांना गुंगारा देऊन निसटून जाई.

एकदा तालुक्याच्या ठिकाणी सरकारी खजिना पोहोचवण्याची जबाबदारी रॉबर्टवर आली. त्यांचा रस्ता जंगल व डोंगरातून जात असल्याने रॉबर्टला जातीने स्वत: लक्ष घालून खजिना तालुक्याला पोहोचवण्याचे आदेश त्याच्या वरच्या अधिकाऱ्यांकडून मिळाले. ही बातमी गुप्त खबऱ्यांनी खाज्या नाईकला दिली.

खाज्या नाईकने लगेच आपल्या टोळीतल्या साथीदारांना एकत्र जमवले. आपल्याला कळलेली बातमी त्याने सर्वांना सांगितली. रॉबर्टला धडा शिकवायची चांगली संधी चालून आल्याबद्दल सर्वांना आनंद झाला. सरकारी खजिन्यात आपलाच पैसा आहे व तो येथून घेऊन जाण्याचा इंग्रजांचा प्रयत्न आपण कसेही करून असफल केला पाहिजे ह्याबद्दल सर्वांनी निर्धार व्यक्त केला.

रात्री उशिरापर्यंत त्यांची खलबतं चालू होती. सर्व बाजूंनी विचार केला जात होता. जिवाला धोका आहे हे सर्वांना माहीत होते. पण रॉबर्ट व सरकारी खजिना निसटता कामा नये ह्या एकाच उद्देशाने ते पेटून उठले होते. शेवटी योजना निश्चित झाल्यावर ते सर्व निवांत झोपी गेले.

रॉबर्ट जंगलात प्रवेश केव्हा करतो ह्याची बातमी मिळवण्यासाठी खाज्या नाईकने आपले हेर पेरून ठेवले होते. जंगलात रस्त्यावर एका अरुंद व धोक्याच्या ठिकाणी अडथळे उभे करून रॉबर्टला कोंडीत पकडायचे असा तो बेत होता. पण रॉबर्टसुद्धा काही कमी नव्हता. सरळ जंगलात

घुसण्याइतका तर तो निर्बुद्ध नव्हताच नव्हता. त्याने संभाव्य धोक्यापासून वाचण्यासाठी काय शक्कल लढवली माहीत आहे?

मुक्काम पुढे नेण्यापूर्वी तो दोन स्वारांचे पथक पुढे पाठवी. एक मैल अंतरावर जाऊन रस्ता निर्धोक असल्याची खात्री करून एक स्वार परत येई व दुसरा स्वार तेथेच थांबे. पुढे धोका नाही ह्याची खात्री झाल्यावर रॉबर्ट आपला मुक्काम पुढे सरकवी. पण पुढे जाताना सैन्याचे एक पथक तो मागे ठेवून जाई. मागून कोणी हल्ला करू नये म्हणून ही काळजी.

अतिशय सुरक्षितपणे असा त्यांचा प्रवास चालू होता. तीन चार दिवस असेच लोटले. सातपुड्यातील जंगले ती, लांब लांबपर्यंत पसरलेली! बरं रस्ता म्हणावा तसा सोपा नाही. उंच, सखल भागांतून, दरड, काट्याकुट्यांतून रस्ता काढावा लागे. रस्ता लवकर संपत नाही असे पाहून रॉबर्ट आता घाई करायला लागला. आपली योजना अतिशय उत्तम असून त्यामुळे आपण अगदी सुरक्षित आहोत असे त्याला वाटायला लागले. पण अतिसुरक्षितता पुष्कळदा बेसावधपणाला कारणीभूत ठरते. आपण सुरक्षित आहोत मग सावधगिरी का बाळगा अशी भावना तयार होते.

तर रॉबर्ट आता पुढचा स्वार परत येण्यापूर्वीच मुक्काम हलवण्याची घाई करू लागला. पुढे पुढे तर परतणारा स्वार व रॉबर्ट ह्यांची अर्ध्या रस्त्यावरच गाठ पडू लागली.

ज्या क्षणाची खाज्या नाईक व त्याचे साथीदार वाट पाहत होते तो आता येऊन ठेपला होता. पुढे पाहणी करण्यासाठी आलेल्या स्वारांची त्यांनी तिकडेच विल्हेवाट लावून टाकली. ह्या स्वारांची वाट न बघता रॉबर्ट निश्चितच पुढे सरकेल हे त्यांना माहीत होते. झालेही तसेच. मोजके सैनिक मागे ठेवून रॉबर्ट सरकारी खजिना घेऊन पुढे निघाला. आणि त्या अरुंद मार्गात बरोबर तो सर्व काफिला सापडला. मागच्या बाजूने जोरदार हल्ला चढवून खाज्या नाईकच्या टोळीने रॉबर्ट व त्याच्या सैन्याची अगदी दाणादाण उडवून दिली. मागे थांबलेल्या सैन्याची तर त्यांनी केव्हाच चटणी उडवली होती. लष्करात पराक्रम गाजवलेल्या रॉबर्टला ह्या पहाडी वीराने पळता भुई थोडी केली.

सरकारी खजिना ताब्यात घेऊन खाज्या नाईक व त्याचे साथीदार आपल्या मुक्कामावर परतले. तो खजिना त्यांनी एका गुप्त ठिकाणी लपवून ठेवला. काही काळानंतर तो पैसा गोरगरिबांमध्ये वाटून टाकण्याचे त्यांनी ठरवले.

ह्या घटनेनंतर खाज्या नाईकने इंग्रजांचे सरकारी खजिने लुटण्याचे सत्रच सुरू केले. जुलमी इंग्रज अधिकाऱ्यांच्या घरांवर दरोडे टाकून पळवलेली लूट तो गोरगरिबांमध्ये वाटून टाकी. त्यामुळे लवकरच तो लोकांना देवदुतासारखा वाटू लागला. ह्याउलट इंग्रजांनी त्याला दरोडेखोर ठरवून पकडून देण्यासाठी मोठे इनाम जाहीर केले.

इंग्रजांच्या लाख प्रयत्नानंतरही खाज्या नाईक काही हाती लागत नव्हता. दर वेळी शिताफीने तो निसटून जाई. लोकं म्हणत खाज्या नाईकला देवाचा आशीर्वाद आहे कारण तो गरिबांना मदत करतो. त्याच्याबद्दल अनेक दंतकथा बोलल्या जाऊ लागल्या. की त्याने अनेक दरोडे टाकून सरकारी खजिना गोळा केला. ती साठवायला जागा नव्हती म्हणून त्याने जंगलातली झाडे पोखरून त्यात तो खजिना दडवून ठेवला.

इकडे इंग्रज त्याला पकडण्यासाठी अगदी आटापिटा करीत होते. त्यांनी मोठमोठ्या इनामांची

लालूच दाखवणे सुरू केले. ह्या प्रलोभनाला नाईकचा जवळचा साथीदारच बळी पडला. मोठ्या इनामाचे प्रलोभन दाखवून इंग्रजांनी त्याला बरोबर आपल्या जाळ्यात पकडले. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे इंग्रजांनी खाज्या नाईकला अंघोळ करीत असताना बंदुकीच्या गोळीने बरोबर टिपले. अशा प्रकारे खाज्या नाईकाचा सहकाऱ्याकडूनच घात झाला.

त्यानंतर लाकुडतोडे जेव्हा जंगलात लाकडे तोडण्यासाठी जात तेव्हा त्यांना अचानक त्या झाडांत खाज्या नाईकने दडवलेले धन सापडे. ते म्हणत...

"खाज्या नाईक जिवंत असताना आम्हां गोरगरिबांना मदत करीत असे. पण आता मेल्यावरसुद्धा तो आम्हांला मदत करीत आहे".

(खाज्या नाईक यांना जाणून घेण्याच्या उत्सुकतेपोटी मी केलेल्या चौकशीत त्या वेळच्या बऱ्याच वृद्ध मंडळींकडून मिळालेल्या माहितीवर आधारीत हे लेखन आहे.)

**संपर्क : ९६१९४५५४५४**

## शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय, महाराष्ट्र राज्य मुंबई
## शिक्षण संचालक (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे– १

**योजनेचे नाव– राजीव गांधी विद्यार्थी सानुग्रह अनुदान योजना**

### योजनेची उद्दीष्ट, व्याप्ती, पार्श्वभूमी

विद्यार्थ्यांना अपघातामुळे पोहोचलेल्या क्षतीची काही प्रमाणात नुकसान भरपाई देण्याचे दृष्टीने तसेच त्यांना सुरक्षा कवच देण्याकरीता राज्यातील इयत्ता १ ली पासून उच्च शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना राजीव गांधी अपघात योजना शासन निर्णय दिनांक ३० ऑगस्ट २००३ पासून राज्यामध्ये लागू करण्यात आली. विद्यार्थ्यांना अपघात झाल्यानंतर दाव्याची रक्कम अदा करावयाची कार्यपध्दती शासन परीपत्रक दिनांक ०१ ऑक्टोंबर २००३ मध्ये विशद करण्यात आली आहे.

**शासन निर्णय दिनांक २१.०६.२०२२ नुसार लाभार्थी निवडीचे निकष :**

- विद्यार्थ्याचा अपघाती मृत्यू :- १५००००/-
- अपघातामुळे कायमचे अपंगत्व (२ अवयव / २ डोळे किंवा १ अवयव व १ डोळा ) :- १००००० /-
- अपघातामुळे कायमचे अपंगत्व (१ अवयव / १ डोळा कायम निकामी):- ७५०००/-
- विद्यार्थ्यास अपघातामुळे शस्त्रक्रिया करावी लागल्यास:- प्रत्यक्ष हॉस्पीटलचा खर्च किंवा जास्तीत जास्त १,००,०००/-
- विद्यार्थी आजारी पडून, सर्प दंशाने किंवा पोहताना मृत्यु झाल्यास :- १५००००/-
- विद्यार्थी कोणत्याही कारणाने जखमी झाल्यास (क्रिडा स्पर्धेत खेळताना शाळेतील जड वस्तू पडून, आगीमुळे, विजेचा धक्का, विज पडून) :- प्रत्यक्ष हॉस्पीटलचा खर्च किंवा जास्तीत जास्त- १,००,०००/-
- शस्त्रक्रिये बाबतचे हॉस्पिटलचे प्रमाणपत्र सिव्हिल सर्जन यांच्या प्रति स्वाक्षरीसह

**योजनेची कार्यपध्दती, कार्यान्वित यंत्रणा, लाभार्थी निवडण्याची पध्दती :**

वरील प्रमाणे समितीसमोर इयत्ता १ ली ते ८ वी व ९ वी ते १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलां/मुलीकरीता प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी अनुक्रमे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील. बृहन्मुंबई करीता शिक्षण निरीक्षक यांनी प्रस्ताव समितीसमोर सादर करावेत. या याजनेअंतर्गत अनुदानाची रक्कम पुढील प्राधान्यक्रमानुसार अदा करण्याचे निर्देश आहेत.

१. विद्यार्थ्यांची आई
२. विद्यार्थ्यांची आई हयात नसल्यास वडील
३. विद्यार्थ्यांचे आई-वडील हयात नसल्यास १८ वर्षावरील भाऊ किंवा अविवाहित बहीण किंवा पालक.

**योजनेची माहिती मिळविणेकरिता संपर्क :**

१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/ योजना) जिल्हा परिषद.
२) शिक्षण निरीक्षक (पश्चिम, उत्तर, दक्षिण)
३) संबंधित शाळांचे मुख्याध्यापक

# काव्यकोडी

■ एकनाथ आव्हाड
संपर्क : ९८२१७७७९६८

◆

भारतीय लष्करात
सेवा त्यांनी दिली
त्याच वेळी खेळाशी
ओळख त्यांची झाली

धावण्याच्या जगात यांची
कामगिरीच विलक्षण
'फ्लाइंग शीख' म्हणून कोणास
ओळखतात सारे जण ?

◆

भारतीय क्रिकेटपटू
'ऑफ द सेंच्युरी'
याच नावाने जग
त्यांचा गौरव करी

भारतीय क्रिकेट संघाचे
नेतृत्व यांनी केले
हरियाणाचे चक्रीवादळ
कोणाचे नाव झाले ?

◆

मेजर ध्यानचंद या खेळाचे
मोठेच जादूगार
साठ मिनिटांच्या या खेळात
गोल करण्यात लक्ष फार

स्टिकने चेंडू पळवण्याचा
खेळ खेळतात सारे
सांगा या खेळाला
काय म्हणतात बरे ?

◆

महाराष्ट्रामध्ये या खेळाची
झाली खरी सुरुवात
पारंपरिक हा खेळ
खेळतात दोन संघात

पाठलाग आणि बचाव
या खेळाची खासियत
उठता, बसता, पळता
हा खेळ कोणता खेळतं ?

◆

तांबड्या मातीतला हा
जगप्रसिद्ध खेळ
बुद्धी आणि चपळतेचा
दिसतो येथे मेळ

धोबीपछाड करून
खेळतात इथे डाव
मल्लयुद्ध, दंगल या
खेळाचे काय नाव ?

◆

या खेळासाठी लागते
हिरवळ असलेले मैदान
गोलजाळ्यात चेंडू टाकणे
या खेळाचा हा प्राण

चेंडूला हात लावणे
यात नियमबाह्य ठरते
पायाने चेंडू पळवणाऱ्या
या खेळाचे नाव कोणते ?

◆

पुरलेला, टांगलेला
दोरीचासुद्धा असतो
अढी, तेढी, बगली,
फिरकी घेताना दिसतो

कधी डोके खाली
तर कधी वर पाय
या कसरतीच्या खेळाचे
सांगा नाव काय ?

◆

या खेळाचा उगम
तमिळनाडूमध्ये झाला
'रेडर' म्हणून संबोधतात
एका खेळाडूला

बचावकर्त्याला स्पर्श केला
की गुण मिळतो राव
कौडी, पकाडा, हुतुतू
या खेळाचे काय नाव ?

# भाऊराया

■ योगेश देवकर

आला आला बाई आज
भावा बहिणीचा सण,
भाऊराया भेटल्यानं
गेलं आनंदून मन.

सोनियाच्या या दिनाची
किती पाहिली गं वाट,
ओवाळण्या भाऊराया
बाई सजवलं ताट.

कुंकू-तिलक लावून
हाती बांधली गं राखी,
भाऊराया सुखी राहो
मला काही नको बाकी.

मायबापा सारखीच
राहो माझ्यावरी छाया,
प्रेमाचीच ओवाळणी
मला दे रे भाऊराया.

संपर्क : ९८६००३१५६२





रामकृष्ण अघोर

# राखीपौर्णिमा

अश्विनी ही इयत्ता चौथीच्या वर्गात शिकत होती. नुकताच तिचा वाढदिवस झाला होता. स्वतःच्या वाढदिवसानिमित्त तिने आपल्या वर्गातील चार-पाच मैत्रिणींना आणि ज्या ठिकाणी राहत होती, त्या ठिकाणी राहणाऱ्या तिच्याबरोबर नेहमी खेळणाऱ्या मैत्रिणींना तिने संध्याकाळी अल्पोपहारासाठी बोलावले होते. त्याप्रमाणे तिच्या दहा-बारा मैत्रिणी अश्विनीच्या वाढदिवसानिमित्त घरी आल्या होत्या. प्रत्येक मैत्रिणीने काही ना काही तरी भेटवस्तू आणली होती. कोणी कंपास, तर कोणी वह्या, कोणी पेन्सिल तर कोणी पैसे! एका मैत्रिणीने तिला हातात घालण्यासाठी तिच्या हाताच्या मापाच्या काही वेगवेगळ्या रंगाच्या बांगड्या आणल्या होत्या.

अश्विनीला बांगड्या एवढ्या आवडल्या की बस्स! तिने त्याच दिवशी त्या रंगीबेरंगी बांगड्या हातात घातल्या. त्या तिने काढल्याच नाहीत.

तिच्या वर्गातल्या सर्व मैत्रिणी तिचं 'किती छान छान आहेत ग बांगड्या', असे कौतुक करू लागल्या. तिलापण कोणी बांगड्यांविषयी बोलले की आनंदच होऊ लागला.

काही दिवस गेले. वाढदिवसाला मिळालेले पैसे तिने तसेच ठेवले होते. 'या पैशांचे काय करावे', याचा विचार ती करत होती.

एकाएकी जशी आकाशात वीज चमकावी तशी तिला एकदम एक कल्पना सुचली. तीन-चार दिवसांवर राखी पौर्णिमा आली होती. तिला सागर नावाचा मोठा भाऊ होता. त्याच्यासाठी ह्या वाढदिवसाच्या पैशाने राखी आणावी. कारण दरवर्षी सागरसाठी राखी तिचे वडीलच आणत असत. ह्या वर्षी तिच्याकडे पैसे असल्याने स्वतःच्या हक्काच्या पैशाने सागरसाठी राखी आणावी आणि वडलांचे पैसे वाचवावेत असा विचार अश्विनीच्या मनात आला.

ती लगेच बाहेर पडली. तिने भावासाठी सुंदर राखी घेतली, व्यवस्थित बांधून घराकडे निघाली. घरी जाताना ती एका दगडाला ठेचकाळली आणि तिने चक्क रस्त्यावर साष्टांग नमस्कार घातला. तिचा फ्रॉक घाण झाला. तिच्या ओठालापण माती चिकटली, यापेक्षा जास्त म्हणजे, तिच्या हातातील सर्व रंगीत बांगड्या फुटल्या आणि घाबरल्यामुळे ती जोरात रडू लागली.

रस्त्यावरच्या जाणाऱ्या-येणाऱ्या नागरिकांनी तिला उचलून उभे केले. तिच्या फ्रॉकवरची धूळ झटकली. तिच्या हाता-पायाला खरचटले होते, तेदेखील पुसून तिला घरी सोडून दिले.

रडत रडत अश्विनी घरात गेली. तिला पाहून तर कुणीच सहानुभूती दाखवली नाही. आई वडील व तिचा भाऊ तर तिलाच रागावू लागले, 'ही काय वेळ आहे का बाहेर जायची?' असे म्हणून दटावले.

सागर तर तिला म्हणाला, 'खरं सांग... कशाला बाहेर कडमडली होतीस?'

तेव्हा प्रसंगावधान राखून ती म्हणाली, "दादा परवाच्या दिवशी राखी पौर्णिमा आहे ना, म्हणून मी तुला राखी आणण्यासाठी गेले होते."

"कुठाय राखी? दाखव बघू", अश्विनी म्हणाली, "राखी तेथेच रस्त्यावर पडली." सागर लगेच जेथे अश्विनी रस्त्यावर पडली होती, तेथे गेला. राखी तशीच पडून होती. जाणारी येणारी वाहने पण राखीच्या बाजूने जा-ये करत होती. एकदेखील वाहन राखी वरून गेले नव्हते. सागरने ती राखी उचलली त्याबरोबर बांगडीच्या रंगीत फुटलेल्या काचा गोळा केल्या आणि घरी आला.

राखी पौर्णिमेचा दिवस उजाडला. सकाळी घरातील सर्वांनी अंघोळीचा कार्यक्रम उरकून घेतला आणि राखी बांधण्याच्या कार्यक्रमास सुरुवात झाली.

प्रथम अश्विनीनी आपला भाऊ सागर ह्याला राखी बांधली. राखी बांधल्यावर अश्विनीने त्याच्या तोंडात पेढा घातला. पेढा खाताच सागरने रंगीत कागदात बांधलेली भेट वस्तू अश्विनीला दिली. मिळालेली भेट उघडून, पाहण्याची तिला खूपच घाई झाली. एकदाचा तिने रंगीत कागद फाडला, आणि भेटवस्तू हातात घेतली आणि पाहू लागली.

त्या भेटवस्तूला समोरून एक पारदर्शक काच



होती. ती वस्तू त्रिकोणी होती. अश्विनीने ती वस्तू डोळ्यांसमोर घेऊन पाहू लागली. तिला वेगवगळ्या डिझाईन व वेगळे रंगीत काही तरी दिसू लागले. तिने ती वस्तू हाताने सतत फिरवत बसली. प्रत्येक वेळी वेगवेगळी डिझाईन दिसू लागली. तिला खूपच गंमत वाटली आणि ती पोट भरून हसू लागली.

अश्विनी सागरला म्हणली, "दादा, हे खेळणं काय आहे रे? कोठून आणलंस?"

तेव्हा सागर म्हणाला, "हे खेळणं मी घरीच तयार केलंय."

"कस काय!" अश्विनी ने विचारले.

तेव्हा सागर म्हणाला, "तुझ्या रंगीत बांगड्यांच्या काचा, ह्या रस्त्यावर पडल्या होत्या ना, त्या मी गोळा केल्या, वाटेत मला आरसेवाल्याचे दुकान दिसले. आरशाचे बरेच तुकडे बाहेर पडले होते. त्या दुकानदाराकडून मी पट्टीच्या आकाराचे आरशाचे तीन समान तुकडे घेतले. त्याच्या भोवती पुठ्ठा चिकटवला. त्यावर रंगीत कागद लावला. एका बाजूने ते बंद केले. दुसऱ्या बाजूने तुझ्या रंगीत बांगड्यांच्या फुटलेल्या काचा घातल्या. एक त्रिकोणी पारदर्शक काच कापून त्याला लावली आणि डोळ्यांनी त्या काचेतून पाहिल्यावर आतील काचांचे ह्या आरशावर एकमेकांवर प्रतिबिंब पडू लागले आणि प्रत्येक वेळी नवीन नवीन डिझाईन होत राहिली आणि ती वस्तू मी तुला भेट दिली."

अश्विनीला खूपच आनंद झाला. ती रस्त्यावर दगडाला ठेच लागून पडलेले दुःख विसरून गेली आणि राखी पौर्णिमेच्या आनंदात न्हाऊन निघाली.

**संपर्क : ९९७०५९५२८५**

# श्रावण आला

■ शं.ल. नाईक

हिरवळ पसरली डोंगर रानी
आला श्रावण आला,
रिमझिम रिमझिम चहूकडे
पाऊस सुरू झाला.

खळखळ खळखळ ओढे सारे
गाऊ लागले गान,
नभोमंडपी दिसू लागली
इंद्रधनूची कमान.

निळ्या अंबरी घेऊन भरारी
उडू लागले पक्षी,
जागोजागी डोंगर रानी
रानफुलांची नक्षी

धोधो धोधो धबधब्याचं
पाणी लागलं हसू,
तळ्याकाठच्या जंगलामध्ये
हरणं लागली दिसू.

डोंगर रानी हिरव्या कुरणी
चरू लागली गुरं,
जेवण करण्या झाडाखाली
जमली गुराखी पोरं

श्रावणमासी एके दिवशी
डोंगर रानी जाऊ
हिरवा सुंदर परिसर सारा
पाहून हो येऊ!

संपर्क : ९९२१२४१०२१





# चला चांगुलपण पेरूया...

मनोज बोरगावकर

सज्जनपणा, संतत्व हे शब्द आपण जागोजागी पुस्तकात वाचलेले असतात. आणि आजही संतत्वाला पोचलेली सज्जन माणसं आपल्याला जागोजागी भेटत असतात. आपण नेहमी म्हणतो की, काळ बदलला... आमच्या वेळी असं नव्हतं... तुमच्या वेळी असं आहे. पण मला नेहमी असं वाटतं की, अगदी प्राचीन काळापासून आजपर्यंत जगात चांगली आणि वाईट माणसं तर राहातच आली आहेत. वाईटाच्या वाईटपणाने जसे जगाचे नुकसान केले अगदी तसेच चांगुलपणाची पणती ही जगाला प्रकाश देत राहिली. आज आपण अशाच एका संतत्वाला पोहोचलेल्या माणसाला भेटणार आहोत त्यांचं नाव तुकाराम महाराज. माझी आणि तुकाराम महाराजांची भेट कशी झाली हीसुद्धा फार मजेदार गोष्ट आहे. गावाकडे असताना आम्ही नाटकं बसवायचो. आम्हांला नाटक करायचा खूप नाद होता आणि शाळेतल्या गुरुजींनी एकदा आमच्याकडून 'अति तिथे माती' हे नाटक बसवून घेतलेलं. रात्री आठ वाजता गावातली लेकरं

# कथा सद्गुणांची

नाटक सादर करत आहेत म्हणून ते पहायला सारं गाव लोटलेलं. आम्ही नाटकाच्या खूप तालमी केल्या, खूप मेहनत केली. त्यामुळे आता आमचं नाटक जोरदार होणार आणि गावातले लोक आमच्यावर खूश होणार या आनंदात आम्ही स्टेजकडे निघालो होतो.

एवढ्यात माझ्या डाव्या बाजूने चालणारा देवबा तंगडी झाडत 'आय आय इऽऽऽ' करीत विचित्र किंचाळला. आमच्या गुरुजींनी हातातल्या कंदिलाची वात मोठी करून जमिनीवर पाहिलं तर देवबाला काळा शार विंचू डसला होता. आता देवबाला विंचू डसणं म्हणजे आमच्या नाटकाचा एकूण बिघाडाच झाला. आम्ही सगळे काळजीत पडलो की, आता आपलं नाटक कसं सादर होणार? देवबा नाटकात भालदाराच्या भूमिकेत उभा असणार होता. आता राजाच्या शेजारी भालदारच नाही तर ते नाटक कसं दिसणार. आम्ही सगळे हिरमुसले झालो. तेवढ्यात आमच्या भोवताली जमलेल्या गर्दीला बाजूला सारून तीरासारखा देवबाचा आज्या आमच्या जवळ आला. त्याच्या गळ्यात माळ होती. तो देवबा जवळ आला आणि म्हणाला, "बघ देवबा, तुकाराम महाराजांचे नाव घे आणि नीट नाटकाच्या खेळात जाऊन उभा राहा. काय बी विपरीत होणार नाही. तुकोबा माऊली तुला नाटकात सांभाळून घेईल." असं म्हणून 'तुकोबा माऊली देते झाडावाणी सावली' असं म्हणत त्या देवबाच्या आजोबांनी स्वतःभोवती घेतलेली गिरकी आजही इतक्या वर्षानंतर माझ्या डोळ्यापुढे जशीच्या तशी उभी राहते. आणि मुलांनो गंमत सांगू, देवबानंही स्वतःभोवती तंतोतंत तशीच गिरकी घेऊन तुकोबांच्या नावाचा गजर केला आणि नाटकभर भालदाराच्या भूमिकेत देवबा उभा राहिला. राजाच्या भूमिकेत असलेल्या माझी नजर नाटकभर देवबाच्या पायाशी होती. आणि मला समजतच नव्हतं की विंचू चावलेला देवबा एवढा संयमितपणे कसा काय उभा? आणि मग लक्षात आलं की त्याला वेदना होत असूनही तुकोबांच्या नावाचा जो गजर होता तो गजर आणि आजोबांचे प्रेरणादायक शब्द देवबाला सगळं विसरून उभे राहण्यास ताकद देऊन गेले. इथेच माझी आणि तुकाराम महाराजांची पहिली ओळख झाली. नंतर पुढच्या काळात तुकाराम महाराज, ज्ञानोबा माऊली, कबीर असे अनेक संत पुस्तकांच्या पानांतून आणि कधीकधी सज्जन माणसांच्या वागण्यातूनही भेटत गेले.

वाईटातल्या वाईट माणसात एक चांगुलपण दडलेलं असतं. असाच एक लहानपणीचा प्रसंग मी तुम्हांला सांगतो. आमच्या गावाच्या पाठीशी डोंगर होता आणि या डोंगराच्या वर टोकाला दरोडेखोर राहतात अशी वदंता होती. मला दरोडेखोरांना भेटायची खूप इच्छा होती. ते कसे दिसतात, ते कसे वागतात हे आपण पाहिलेच पाहिजे असं मला त्या वयात वाटत होतं. एकदा मी गच्चीवर पतंग उडवत होतो. पतंग उडवता उडवता मी हातातला चरखा सोडून दिला आणि पतंग कटली. पतंग कटली या नावाखाली पतंगाच्या मागे मागे धावत डोंगराच्या दिशेने निघालो. धावत धावत डोंगर चढून गेलो. डोक्यात एकच ध्यास होता की, दरोडेखोर कसे दिसतात हे पाहायचं. मी डोंगर चढून बराच लांबपर्यंत चालत आलो आणि काही वेळानंतर एके ठिकाणी चुलीवर अन्न शिजवत पाच-सहा माणसं बसलेली मला दिसली. ती गावातला कोणाचा वाडा केवढा आहे, कोण कसा श्रीमंत आहे, कुठे काय घबाड सापडेल अशा चर्चा करीत होती. माझे पाय लटपटा कापायला लागले कारण साक्षात खरेखुरे दरोडेखोर प्रत्यक्ष समोर उभे होते. मी घाबरून गेलो तेवढ्यात त्यांच्या म्होरक्याचे लक्ष माझ्याकडे गेले आणि त्याने प्रेमाने माझ्याकडे पाहिले. त्यांच्या साथीदाराला म्हणाला, "अरे बाबा लेकरू रस्ता चुकलेलं दिसतंय. त्याला भाकर तुकडा खाऊ घाला आणि गावाच्या वेशीपर्यंत सोबत करून सोडून या." मी आवाक झालो

पण मी अजूनही लटलटा कापत होतो. त्यातल्या एकाने मला जवळ घेतले. चुलीवर शिजत असलेले पिठले आणि गरम गरम भाकरी एका ताटलीत वाढली आणि आग्रह करून करून मला खाऊ घातली. त्या वेळी आतासारख्या बिसलेरीच्या बाटल्या नव्हत्या. पाण्यासाठी माठ होते. त्याला तर आम्ही 'इंडियन फ्रीज' म्हणायचो. अशाच एका माठातून त्यांनी मला पाणी प्यायला दिलं. त्या थंडगार पाण्याने आणि भरल्या पोटामुळे माझी भीती जरा कमी झाली. मी हिम्मत करून त्या म्होरक्याला विचारलं, "काका तुम्ही काय काम करता?" "पोरा तुला काय करायच्या रे चौकशा? आपला आपला गप गुमानं गावाकडे जा." त्याने सहकाऱ्यांकडे पाहिलं आणि म्हणाला, "तुम्ही दोघे जाऊन या पोराला गावच्या वेशीपर्यंत सोडून या." मग त्या दोघांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला आणि त्यांनी मला गावाच्या वेशीपर्यंत आणून सोडलं. ते म्हणाले, "पुन्हा तिकडे येऊ नकोस लेकरा आणि कोणाला काही म्हणू बी नकोस, बरं की. आता जातोस की घरापर्यंत एकला." मी कशीबशी मान हलवली आणि धावत पळत घरी आलो. माझ्या मनात सारखे विचार येत होते की ते दरोडेखोर असून माझ्याशी किती चांगले वागले. याचाच अर्थ माणसाचा मूळ धर्म हा चांगुलपणाचा आहे. परिस्थितीमुळे, काही कारणांमुळे त्याच्यावर वाईटाची पुटं चढतात. तुकाराम महाराज, ज्ञानोबा माऊली, कबीर, चोखामेळा, जनाबाई अशा संतांचा जन्म होतो आणि माणसाच्या जगण्यावर आलेलं हे वाईटपण ते खसाखसा पुसून टाकतात आणि आधीच सुंदर असलेले जग ते अधिक सुंदर करत जातात. मित्रांनो, या संतांच्या कथा, गोष्टी, किस्से नेहमी ऐकत राहायचं आणि इतरांना सांगत राहायचं म्हणजे आपोआपच या जगात चांगुलपण पेरलं जाईल.

ब्लाव्हत्स्की नावाची एक रशियन लेखिका होऊन गेली. ती जगभर फिरायची आणि फिरताना आपल्या पिशवीत अनेक रंगीबेरंगी फुलांच्या बिया ठेवायची. ती जिथे जाईल तिथे त्या बिया पेरत राहायची. लोक तिला हसायचे म्हणायचे, "बाई तू बिया पेरते आहेस. या झाडांना फुले येतील पण ते पाहायला तू कुठे इथे असणार आहेस?" ती हसायची आणि म्हणायची की, "मी इथे नसले तरी काय होईल. या बियांची झाड होतील... त्याला रंगीबेरंगी फुल येतील, लोक ती बघतील आणि आनंदी होतील. त्यांच्या आनंदातच मला समाधान मिळेल." किती सुंदर आहे नाही हे! मग तुम्ही आता या थोर संतांचे विचार आपल्या वागण्यातून पेरत रहा... हे जग चांगलं, सुंदर, सज्जन लोकांचं करण्यात तुमचाही खारीचा वाटा असेल. आपण सगळे मिळून आजपासून या संतांच्या विचारांची पालखी वाहू या....! बरं त्यासाठी आपल्याला फार असं वेगळं काही करायची गरज नाही. शाळेत आपल्या एखाद्या मित्राने डब्बा आणला नसेल तर आपल्या डब्यातली एखादी पोळी किंवा कोरभर भाकरी त्याला देऊन आपण या जगातल्या चांगुलपणाचा विस्तार करू शकतो.


**संपर्क : ९८६०५६४१५४**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी सोहेल एंटरप्रायजेस सर्व्हे नं. ४८, घर पट्टी नं. ४०२, भांडार्ली व्हिलेज, नॅशनल काट्याजवळ, ठाणे ४०० ६१२, येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११ ००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक– कृष्णकुमार पाटील.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Sohail Enterprises, S.No. 48, Ghar Patti No. 402, Bhandarli Village, Near National Kata, Thane- 400 612 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune- 411 004 * Editor : Krishnakumar Patil.**

# आली पालखी ढगांची

■ प्रवीण दवणे



निळ्या नभातून आली बघ पालखी ढगांची!
मध्ये थेंबुटा विठ्ठल, होई पंढरी धरेची!

झाडा -पानांतून गुंजे, ओल्या वाऱ्याची चिपळी
मन उमलून येई, मेघ दिसताच डोळी!

शेत मळ्यातून सुरू, उभ्या कष्टाची पेरणी
बीज पेरता रुजती, नव्या तृप्ततेची लेणी!

साऱ्या अभंग तृषेला, साथ पावसाची मिळे
येता अंकुर वरती, ओवी पानात उजळे

पंख भिजली पाखरे, एकमेकां विचारिती
कधी येतील, येतील, सांगा कणसात मोती?

साऱ्या जगासाठी, येई, चोहीकडे घन निळा
साद आपली पोचता, होई सावळा सावळा!

पुन्हा भेटीला तो आला, नका पाहू रे दुरूनी
थोडे भिजवावे मन, गाणे कंठात भरूनी!

संपर्क : ९८२०३८९४७४



मृणालिनी वनारसे

# ॲमेझॉनच्या जंगलात... चाळीस दिवस



एकदा एक जंगल होतं!
होतं नाही, आहे.

खूप मोठं जंगल! किती मोठं? थोडी कल्पना लढवून पहा. आपल्या गावाएवढं? आपल्या शहराएवढं? त्याहूनही मोठं? आपल्या अख्ख्या देशाएवढं? नाही नाही, त्याहूनही मोठं. आपल्या देशाच्या दुप्पट आकाराचं जंगल. अबब! आश्चर्य वाटतं ना! एवढं विशाल असं एकच जंगल, वर्षावन आपल्या ग्रहावर आहे आणि त्याचं नाव आहे, अर्थातच, ॲमेझॉन.

ॲमेझॉन म्हटल्यावर काहींना शॉपिंगची आठवण होईल. अमुक तमुक गोष्ट 'ॲमेझॉन वरून मागव किंवा मागवूया' असं कदाचित कोणी बोलताना तुम्ही ऐकलं असेल. पण ते एक डिजिटल ॲप आहे. आपण ज्या ॲमेझॉनविषयी बोलतो आहे ते खरंखुरं जंगल आहे. त्याचं क्षेत्रफळ इतकं मोठं आहे की ते जंगल एकूण नऊ देशांमध्ये विभागलं गेलं आहे. अजूनच अवघड वाटतंय ना डोळ्यांसमोर आणायला? अनेक शतकं इथे माणसाचा वावर नव्हता. फार थोडी माणसं इथवर पोचली आणि राहू शकली. सोळाव्या शतकात काही स्पॅनिश लोक इथे पोचले आणि त्यांना या जंगलाचा नव्याने शोध लागला असं म्हणायला हरकत नाही. त्यांनीच या भल्या मोठ्या जंगलाचं नाव ठेवलं ॲमेझॉन. त्यांनी इथे युद्ध करणाऱ्या टोळ्या पाहिल्या होत्या. स्त्रियासुद्धा जिथे पुरुषांच्या बरोबरीने लढत होत्या अशा लढाया त्यांनी पाहिल्या आणि त्यांना ग्रीक कथांमधल्या ॲमेझॉन योद्ध्यांची आठवण झाली आणि त्यांनी इथून वाहणाऱ्या नदीला नाव ठेवलं ॲमेझॉन. तिच्या खोऱ्यातलं जंगल ते ॲमेझॉनचं जंगल. अर्थातच इथे आधीपासून राहणाऱ्या माणसांनी इथल्या खळखळत्या उपनद्यांना, खोऱ्यांना वेगवेगळी नावं दिलेली होती, आजही ती वापरली जातात. पण ॲमेझॉन नाव सर्व जगात प्रसिद्ध झालं. घनदाट जंगल म्हटल्यावर तुमच्या मनात काय काय आणि कोण कोण येतं? या जंगलात आहेत प्राणी, पक्षी, कीटक, झाडं, झुडपं, वेली यांच्या हजारो प्रजाती. यांच्यातच आहेत. ॲनाकोंडा साप, विषारी बेडूक, जॅग्वार, अस्वले, विषारी बेडूक आणि असे बरेच कोण कोण.

तर सांगायची गोष्ट अशी की या जंगलात याच वर्षी मे महिन्याच्या एक तारखेला एक दुर्घटना घडली. कोलंबिया नावाचा देश आहे आणि ॲमेझॉनचं जंगल या देशाचाही मोठा भाग आहे. एक छोटं विमान या देशातल्या एका गावातून त्याच देशातल्या दुसऱ्या एका शहरात निघालं होतं. त्यात एकूण सात माणसं होती. एक वैमानिक, एक तिथला स्थानिक नेता एक महिला आणि चार मुलं. विमान उडाल्यावर थोड्याच वेळात वैमानिकाने जाहीर केलं की इंजिनात काहीतरी गडबड आहे. पुढे काही करायला फारसा वाव मिळाला नसावा. त्या विमानाचा रेडिओ संपर्क तुटला आणि विमान जंगलात कोसळलं. इतक्या मोठ्या आणि घनदाट जंगलात हे विमान कोसळलं की गवताच्या गंजीत सुई पडण्यासारखंच होतं ते. कसं शोधायचं? आणि आतल्या माणसांचं काय झालं? इथेच खरी गोष्ट सुरू होते. या विमानातली मोठी माणसं या अपघातात वाचू शकली नाहीत. मुलं मात्र वाचली. कशी वाचली? अजून नीटसं सारं समजलं नाही. अपघातग्रस्त विमानाचा शोध घ्यायला माणसं निघाली. त्यांना विमान सापडलं. मोठ्या माणसांचे मृतदेह मिळाले. पण मुलं? मुलं कुठे दिसेनात.. त्यांच्यात सगळ्यात मोठी मुलगी, लेस्ली, तेरा वर्षांची. त्यानंतर अनुक्रमे सोलेनी (वय नऊ वर्षे) आणि टिएन (वय चार वर्षे) हे भाऊ

आणि सगळ्यात कडी म्हणजे जेमतेम एक वर्षाचं एक छोटं बाळ होतं त्यांच्यासोबत. त्या तान्हुलीचं नाव क्रिस्टीन. हे सगळे कुठे गेले? बचाव पथकाला काही केल्या मुलं दिसेनात. चाळीस दिवस शोधकाम चालू होतं. ॲमेझॉन जंगल पिंजून काढणं काय सोपं काम होतं? जमिनीवर माणसं फिरून त्यांचा शोध घेत होती तशी हेलिकॉप्टरमधूनही जंगलाचा वेध घेत होती.

इथे एक सांगण्यासारखी गोष्ट अशी की ही मुलं तिथल्या हितोतो नावाच्या स्थानिक जमातीची मुलं होती. हेलिकॉप्टरमधून शोध घेणाऱ्या पथकाने मुलांसाठी चक्क त्यांच्या आजीच्या आवाजातला संदेश रेकॉर्ड करून तो वाजवायला सुरुवात केली होती, 'बाळांनो, आहात तिथे थांबा, आम्ही तुमचा शोध घेतोय. आम्ही तुमची वाट पाहतोय.' मुलं एका जागी असतील तर कदाचित त्यांना शोधणं सोपं गेलं असतं! आणि अखेर काही खुणा सापडायला सुरुवात झाली. एक दुधाची बाटली, कात्री, डायपर आणि इतर काही गोष्टी. पायाच्या खुणादेखील मिळाल्या आणि लक्षात आलं की मुलं जवळपासच कुठेतरी असली पाहिजेत. आणि ती सर्व मुले सापडली. अपघातानंतर तब्बल चाळीस दिवसांनंतर ही चार मुलं (तान्ह्या क्रिस्टीन सह) सुरक्षित सापडली! काय आनंद झाला असेल शोध घेणाऱ्या माणसांना. या मुलांच्या नातेवाईकांना!!

ही बातमी जगात सर्वदूर पोचली आणि अनेकांना आनंदासोबत आश्चर्य वाटलं, अशा भीतीदायक जंगलात चाळीस दिवस? मुलं कशी राहिली? त्यांनी काय केलं? मुख्य म्हणजे खाल्लं काय? स्वतःचं संरक्षण कसं केलं? तान्ह्या बाळाला कसं सांभाळलं?

तुम्हांला काय वाटतं? त्यांनी काय काय केलं असेल?

मुलं सापडली तेव्हा ती भुकेली होती, जंगलातल्या माशा, किडे चावल्याच्या खुणा त्यांच्या शरीरावर होत्या. पण या सगळ्यातून ती तगली आहेत. ती जेव्हा आपली गोष्ट सांगतील तेव्हा आपल्याला त्याच्या या थरारक साहसाविषयी खूप काही कळेल. पण तूर्तास जे कळलं आहे त्यातून एवढा बोध नक्की होतो की ही मुलं साहसासाठी तयार होती. प्रसंग पडला तर त्याला कसं तोंड द्यायचं त्यांना माहीत होतं. सगळ्यात दुःखद गोष्ट अशी की त्यांची आई अपघातानंतर चार दिवस जिवंत होती. आईच्या जाण्यानंतरही मुलं धीर धरून राहिली. त्यांची लेस्ली ताई त्यांच्यात सगळ्यात अनुभवी. तिनं आपल्या भावंडांना सांभाळलं असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. विमानातून पडलेल्या सामानात थोडं अन्न होतं, ते त्यांना काही काळ पुरलं. पुढे त्यांनी जंगलात कंद मिळवले, फळं मिळवली.

तुम्हांला ठाऊक असेल जंगलात जशा खाण्यायोग्य वनस्पती असतात, तशा विषारीही असतात. काही वेळा त्या अगदी सारख्या दिसतात. काय खायचं हे जसं माहीत पाहिजे, तसं काय नाही खायचं हेदेखील तुम्हांला कळलं पाहिजे. मधाचं पोळं दिसलं तर मध खाता येईल हे त्वरित सुचेल, पण माश्यांना कसं तोंड द्यायचं हे कळलं पाहिजे. जंगलातले वेगवेगळे वास ओळखता यायला हवेत. शिकारी प्राणी आजूबाजूला असेल तर त्यापासून बचाव करण्याचं कळलं पाहिजे. नदी ओलांडता यायला हवी, निसरड्या, बोचऱ्या खडकांवरून दिवसंदिवस चालता यायला हवं. एवढी सगळी तयारी असेल तर जंगलात आपण तग धरू शकणार. थोडेथोडके नाही तर चाळीस दिवस



**ॲमेझॉनचे घनदाट जंगल**

मुलांनी हे करून दाखवलं. हे सगळं काय त्यांना एका दिवसात आलं असेल? अभ्यासक म्हणतात की ॲमेझॉनच्या जंगलात राहणाऱ्या जमातींना हे सारं अजूनही माहीत आहे आणि मोठ्यांकडून मुलंदेखील ही कौशल्यं शिकून घेतात. तेव्हाच तर असं तगून राहणं शक्य होतं!

अजून एक विलक्षण बाब म्हणजे या मुलांना शोधण्यात एका उत्तम प्रशिक्षित कुत्र्याची मदत घेतली गेली होती, तो कुत्रा मात्र हरवला आहे. शोध पथकाला याचं आश्चर्य वाटतं आहे कारण त्यांना तो दोनदा दिसला होता. तो कुठेतरी निघून गेला. त्याला अन्नाचं आमिष दाखवूनही तो लांब पळून गेला. त्यासाठी एक सहचरी आणली होती, तिचा आवाज ऐकून तो येईल असं शोध घेणाऱ्यांना वाटलं होतं. पण तो आला नाही. तो का? जंगल आणि तिथलं मुक्त जीवन बघून आपणही असं राहावं असं त्याला वाटलं असेल का? आपल्याला माहीत नाही. माणसांना वेगळंच वाटतंय. तो कुत्रा काही जंगली नव्हता. पाळीव कुत्र्याला ॲमेझॉनसारख्या जंगलात प्राण्यांपासून स्वतःचं रक्षण करता येईल का अशी भीती त्यांना वाटतेय. ॲमेझॉनसारख्या जंगलात आश्चर्याला काय तोटा? कदाचित कुत्रा सापडेलही. तूर्तास आपल्याला काही माहीत नाही.

आपण एवढंच म्हणू शकतो की एका महाकाय वनात चाळीस दिवस माणसाची बाळं तगून राहिली. मुलांच्या त्या धैर्याला, कौशल्याला सलाम.

**संपर्क : ९८२२०००८६२**

# कुतूहल

अमित डहाणे, ९४२१०५०३८८

'किशोर' मित्रांनो, 'किशोर'एप्रिल२०२३ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ ऑगस्ट २०२३ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत.

**१) सध्या चर्चेत असणारा 'सेंगोल' हा मूळ शब्द कोणत्या भाषेतील आहे?**

१) हिंदी २) तमिळ ३) तेलगु ४) मल्याळम

---

**२) '५ जून' हा 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून कोणत्या सालापासून साजरा केला जातो?**

१) १९७२ २) १९९२ ३) १९९७ ४) २०१२

---

**३) भारताचे नवे कायदामंत्री म्हणून कोणी पदभार स्वीकारला?**

१) अमित शहा २) किरण रिजिजू
३) नितीन गडकरी ४) अर्जुन राम मेघवाल

---

**४) भारताचे राष्ट्रीय गीत ' जण गण मन ' १९११ मध्ये प्रथम कोणत्या नावाने लिहिले गेले होते?**

१) भारत भाग्य विधाता २) जय हे जय हे
३) भारत का गीत ४) मातृगीत

---

**५) भारताचा राष्ट्रध्वज १९२१ मध्ये सर्वात प्रथम कोणी तयार केला होता?**

१) पिंगाली वेंकय्या २) स्वातंत्र्यवीर सावरकर
३) सुभाषचंद्र बोस ४) पं . नेहरू

---

**६) १५ ऑगस्ट हा दिवस भारताप्रमाणे कोणत्या देशाचा स्वातंत्र्य दिवस आहे ?**

१) श्रीलंका २) म्यानमार
३) बांगलादेश ४) दक्षिण कोरिया

---

**७) भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर भारताच्या भूमीमध्ये सर्वात शेवटी सामील झालेले राज्य कोणते?**

१) गोवा २) आंध्रप्रदेश ३) जम्मू काश्मीर ४) सिक्कीम

**८) भारतीय रेल्वेचे राष्ट्रीयीकरण कोणत्या वर्षी झाले?**

१) १९४७ २) १८५३
३) १९५१ ४) २०१४

---

**९) इंग्रज सरकारच्या १५० वर्षांच्या राजवटीत 'मार्शल लॉ'ची अंमलबजावणी करण्यात आलेले एकमेव शहर कोणते ?**

१) सोलापूर २) आग्रा
३) दिल्ली ४) भोपाळ

---

**१०) जागतिक आरोग्य संघटनेकडून कोणत्या साली भारताला 'पोलिओ आजारमुक्त' असे घोषित करण्यात आले?**

१) २००० २) २००५
३) २०१० ४) २०१४

---

**११) भारताच्या स्वातंत्र्य दिनाचे दिल्ली येथील सैनिकांचे संचलन सर्वात प्रथम कोणत्या वर्षी दूरदर्शनवर प्रसारित झाले?**

१) १९७४ २) १९५१
३) १९८२ ४) १९९७

---

**१२) स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांत भारतीयांचे सरासरी आयुर्मान ३२ वर्षांवरून किती वर्षांपर्यंत वाढले आहे?**

१) ७० वर्ष २) ८० वर्ष
३) ९० वर्ष ४) १०० वर्ष

---

**१३) मराठी नाट्य परिषदेच्या अध्यक्षपदी कोणाची निवड करण्यात आली आहे?**

१) नरेश गडेकर २) अजित भुरे
३) अशोक सराफ ४) प्रशांत दामले

**१४) महाराष्ट्रातील २९ वी महानगरपालिका म्हणून कोणत्या शहराची घोषणा करण्यात आली आहे?**

१) जालना २) बीड


३) लातूर ४) उस्मानाबाद

**१५) नुकताच कोणत्या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात 'लिथियम'चा साठा सापडलेला आहे?**

१) बिहार २) महाराष्ट्र

३) राजस्थान ४) गुजरात

## चित्रकोडे जुलै २०२३ उत्तरे




## कुतूहल जुलै २०२३ ची उत्तरे

| | | |
|---|---|---|
| १) – ४ | ६) – ४ | ११) – ३ |
| २) – १ | ७) – १ | १२) – ४ |
| ३) – ४ | ८) – ३ | १३) – ३ |
| ४) – २ | ९) – २ | १४) – १ |
| ५) – ३ | १०) – १ | १५) – ३ |

## कुतूहल जून २०२३ – यशस्वी स्पर्धक

कु. श्रीरुप कोरडे, कु. सुवीर फडे, कु. युक्ता देशमुख

## चित्रकोडे जून २०२३ – यशस्वी स्पर्धक

- **पुणे** – कु. प्रणव दाभाडे, कु. शरण्या थिटे
- **सातारा** – कु. सुवीर फडे
- **सांगली** – कु. समृद्ध नाईक
- **नाशिक** – कु. आराध्या परदेशी, कु. कार्तिक सूर्यवंशी, कु. रुद्र परदेशी, कु. राजेश्वरी परदेशी, कु. माधुरी परदेशी, कु. कल्याणी नाईक, कु. आस्था परदेशी
- **अकोला** – कु. अंकुश शेटे, कु. युक्ता देशमुख
- **अहमदनगर** – कु. प्रेम झंवर
- **कोल्हापूर** – कु. आदर्श शिंदे, कु. कार्तिक पाटील, कु. कार्तिका पाटील, कु. पल्लवी रेडेकर
- **हिंगोली** – कु. श्रीरुप कोरडे
- **नागपूर** – कु. राम सावंत
- **धुळे** – कु. यामिनी गोसावी

## चिंटू

**चारूहास पंडित / प्रभाकर वाडेकर**



# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

- तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
- जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
- ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ'. तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु. ५/– चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.



माझी आई दररोज सकाळी लवकर उठते व पटपट काम आवरते. मी अंथरुणातच असते तेव्हा तिचे काम आवरलेले असते. एक दिवस मलाही तिच्याबरोबर जाग आली. मला एका छोट्या मांजरीच्या पिल्लाचा आवाज येत होता. मी आईला सांगितले तशी आई म्हणाली, "हो गं. चल आपण शोधूया." आम्ही दोघी बॅटरी घेऊन पिल्लाचा शोध घेऊ लागलो. घराच्या बाहेर एका झुडपाआड एक मांजरीचे पिल्लू लपून बसले होते. त्याला चालताही येत नव्हते. मी उचलून त्याला घरात नेले व मऊमऊ टॉवेलमध्ये गुंडाळले. त्याला जराशी ऊब मिळाल्यानंतर त्याच्या पायाला औषध लावून पट्टी केली. मग कुठे त्याचे ओरडणे कमी झाले. त्याला भूक लागली असेल या विचाराने मी स्वयंपाकघरात गेले. एका वाटीत दूध आणले व त्याला ते पाजले. बाहेरची व आतून ऊब मिळाल्यामुळे त्याला शांत झोप लागली व मलाही मुक्या जीवाची मदत केल्याने समाधान मिळाले.

**गायत्री किशोर हासे**

इयत्ता ३ री, तु. अ, जि. प प्रा. शाळा राजापूर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर



एकदा आमच्या काकांनी आमच्या घरी नुकतंच जन्मलेलं छोटंस, मांजरीचे गोंडस पिल्लू आणले होते. ते आमच्या घरात आल्यावर कावरबावरे होऊन इकडेतिकडे धावू लागले. पहिल्या दिवशी ते घाबरलेले होते. नंतर ते आमच्या सर्वांकडे येऊ लागले. ते पाच महिन्यांचे झाल्यावर बाहेर खेळत असताना एका गाडीने धडक दिली. त्याचा एक पाय निकामी झाला होता. त्याची अवस्था मला पाहावत नव्हती. मला खूप रडू कोसळले. मी रोज शाळेत जाताना व शाळेतून आल्यानंतर एका वाटीत दूध व एका वाटीत चपाती द्यायचे. मी रोज त्याची खूप काळजी घ्यायचे आणि माझ्या मनासारखे झाले. एक–दीड महिन्याने ते पूर्णपणे ठीक झाले. ते ठीक झाल्यावर मला खूप आनंद झाला होता. मी लाडाने त्याचे नाव किरा असे ठेवले. माझ्या आई–बाबांनी माझे खूप कौतूक केले.

**श्रावणी संतोष दगडे**

इ. ७ वी, जि. प. प्रा. केंद्रशाळा, अंदोरी, मु.पो. अंदोरी, ता. खंडाळा, जि. सातारा ४१५५२१



आमचे घर नदीच्या जवळ आहे. आम्ही एक कुत्रा पाळला आहे. त्याला आम्ही लाडाने बंड्या म्हणतो. एके दिवशी आमचे सोमाकाका शेळ्या राखण्यास घेऊन गेले होते. तेव्हा सोबत बंड्याही होता. अचानक झाडीतून चार लांडग्यांनी शेळ्या व कोकरांवर हल्ला केला. तीन कोकरांना तोंडात धरून लांडगे पळत होते. बंड्या कुत्र्याने व काकाने पाठलाग केला. लांडग्यांची व बंड्याची झटापट झाली. यातून दोन कोकरे जखमी अवस्थेत वाचली. मात्र एक कोकरू लांडग्याने दाट झाडीत पळवून नेले. आमच्या बंड्या कुत्र्यालाही जखमा झाला होत्या. रात्री मी, बाबांनी आणि काकांनी बंड्याच्या जखमांवर हळद भरली. तो थोडा लंगडतही होता. १० दिवसांनंतर बंड्या पूर्ण बरा झाला. त्याच्या जखमाही भरून आल्या. बंड्यामुळेच दोन कोकरांचा जीव वाचला. आमच्या सर्वांच्या लाडक्या बंड्याचा आम्हांला खूप लळा आहे.

**कु. अथर्व विजय पवार**

इयत्ता ४ थी, जि.प.प्रा.शाळा, पवारवाडी (कडलास), ता. सांगोला, जि. सोलापूर



मी इयत्ता पहिलीत शिकते. माझ्या शाळेचे नाव गुरूकुल स्कुल आहे. माझ्या मैत्रिणीचे नाव चित्रा आहे. आमची जेवणाची सुट्टी झाली तेव्हा चित्रा रडत होती. मी तिला विचारले तू का रडते? तिने सांगितले की तिने डबा आणला नाही व चार दिवस ती शाळेत येणार नाही. कारण तिच्या आईची तब्येत बरी नाही. तेव्हा मी चित्राला माझा जेवणाचा डबा दिला. आम्ही दोघींनी जेवण केले व तिला सांगितले की मी तुझ्यासाठी जेवणाचा डबा आणेन. तू शाळा बुडवू नको. मग ती रोज शाळेत यायला लागली. मी तिची मदत केली म्हणून माझ्या आई-वडलांनी व चित्राच्या आई-वडलांनी माझे खूप कौतुक केले.

**श्रेया अतुल गाठे**

एन-९, एच-१३१/२, श्रीकृष्णनगर हडको, छत्रपती संभाजी नगर



मी इयत्ता चौथीची विद्यार्थिनी आहे. माझ्या घरावळ एक मोठे झाड आहे. त्या झाडावर अनेक पक्षी राहतात. संध्याकाळची वेळ होती. मी माझ्या मैत्रिणीसोबत अंगणात खेळत होते. खेळता खेळता माझे लक्ष सहज झाडाजवळ गेले. तेथे एक कबुतर झाडावरून खाली पडले होते. ते खूप विव्हळत होते. मी माझ्या मैत्रिणीसोबत धावतच त्याच्या जवळ गेले. त्याला अलगद उचलून घरात आणले. त्याला पाणी पाजून थोडेसे ज्वारीचे दाणे खायला दिले. त्याच्या पंखाला थोडेसे खरचटले होते. त्याला मी थोडेसे मलम लावले त्यामुळे त्याला जरा बरे वाटले. थोड्या वेळाने त्याला चांगले वाटल्यामुळे मी त्याला झाडाजवळ सोडले व ते लगेच उडून झाडावर गेले. आई-वडलांना याचा खूप आनंद झाला.

**कु. हेतल प्रशांत कोठारी**

३१/१ प्रोफेसर कॉलनी, कोणार्क अपार्टमेंटजवळ, देवपुरी, जि. धुळे



आमच्या शाळेपासून माझे घर दूर आहे. एक दिवस शाळेत येताना कुत्र्याचे पिल्लू रस्त्यावर दिसले. ते खूप घाबरलेले होते. त्याच्या पायाला जखम झालेली होती. मी त्याला शाळेत नेले आणि माझ्याकडे असलेला रुमाल त्याच्या पायावर बांधला. काही दिवसांनी त्याची जखम बरी झाली. मी त्याला माझ्या घरी ठेवले आणि त्याची चांगली देखभाल केली. मी ही गोष्ट सरांना सांगितली. सरांनी मला शाबासकी दिली व माझे कौतुक केले.

**सार्थक नितीन शिंदे**

जि. प. प्रा. शाळा कडूवस्ती, सात्रळ, सोनगाव, जि. अहमदनगर

# उमलती प्रतिभा

## सैनिक

कुटुंबाचा त्याग करून देशासाठी जगतात...
शत्रू सैन्यालासुद्धा एका बंदुकीच्या गोळीवर गार करतात...
स्वत:च संपूर्ण आयुष्य देशासाठी समर्पित करतात...
आज आम्ही सर्व जण सुरक्षित आहे कारण माझ्या देशाचे
शून्य तापमानातसुद्धा सैनिक सीमेवर पहारा देतात...
उन्हाळा असो वा पावसाळा चोवीस तास
त्यांची सेवा बजावतात...
उष्ण तापमानात सुद्धा छाती ताठ करून उभे असतात...
नोकरी म्हणून नव्हे तर देशासाठी ते
सैन्यामध्ये भरती होतात...
आज आम्ही सर्व जण आनंदाने सण साजरा करतो कारण
माझ्या देशाचे सैनिक रात्रीसुद्धा सीमेवर उभे असतात...
एका बंदुकीच्या गोळीवर आयुष्य लिहिलं असताना ते
प्रत्येक क्षण देशासाठी जगत असतात...
देशावर कोणतंही संकट येवो मदतीला सर्वात आधी माझ्या
देशाचे सैनिक उभे असतात...
आम्ही रात्री झोपलो असताना ते
देशासाठी पूर्ण रात्र जागतात...
आज पण आम्ही अभिमानाने जगत असतो कारण माझ्या
देशाचे सैनिक सीमेवर उभे असतात...

**पल्लवी जोतिबा रेडेकर**
विद्या मंदिर मनवाड,
मु. पो. मनवाड, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

## सुंदर माझी शाळा

शाळा आमची आहे किती छान
रोज आम्ही शाळेत जाणार
शाळेत आमच्या फुले किती छान
म्हणून येतात फुलपाखरे छान
आम्ही लावली छान छान झाडं
म्हणून तर आम्ही घेतो छान वारं
आमच्या वर्गात आहेत चित्रे छान
म्हणून करतो आनंदात लेखन, वाचन
शाळा म्हणजे ज्ञानाचे मंदिर
शाळेत आत विद्येचे कंदील
शिकवण घेऊ थोर महात्म्यांची
माहिती मिळवू पृथ्वीवरील साधनसंपत्तीची

**कु. निखिल गावडे**
इयत्ता ६ वी, जि.प.प्रा.शाळा, सरमळे देऊळ
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग ४१६५११

## पिंजऱ्यातला पोपट

पोपटा पोपटा बोलतोस गोड
झालास रोड, खा जरा पेरूची फोड
भाऊ, भाऊ बोलतोस गोड
देतोस फोड, पिंजरा उघड आणि मला सोड
रानात जाईन, फळे खाईन
झाडावर बसून झोके घेईन

**मनस्वी मयुर कांबळे,**
इयत्ता– ५वी,
जि. प. पू. प्राथमिक शाळा, सरमळे देऊळ,
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग



**कु. साक्षी शंकर पाईकराव**
इ.५वी, जि.प.प्रा.शाळा, रांजणगाव (शे.पु.),
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ४३११३६




**कु. ईश्वरी नरेश लाखे**
इ. ८ वी, जि. प. प्रा. शाळा, खंडाळा,
ता. तेल्हारा, जि. अकोला




**कु. प्रियदर्शिनी शामसुंदर गोरे**
इयत्ता ४ थी, जि. प. प्रा. शाळा, जाकेपिंपरी,
ता. परंडा, जि. उस्मानाबाद



**कु. वैदवी दिनेश वानखडे**
इ. ८ वी, आदर्श हायस्कूल, ता. दर्यापूर, जि. अमरावती



**कु. तनुजा संतोष पवार**
इयत्ता सहावी, जि.प प्रा.शाळा पुरी,
ता. चांदवड, जि. नाशिक 423101

# पाठलाग

घनश्याम देशमुख
संपर्क ९८२३४१३६२९




बापरे! हा तर तात्या..
सोमेश्वर मंदिराचा
चौकीदार.
काय तात्या, विचार काय करतोस?
अरे गावकऱ्यांना काही कळणार
नाही. मदत केलीस तर तुला आम्ही
भरपूर पैसेही देऊ ...
जा रे... बाहेरच्या खोलीतले ते
सामानाचे पोते घेऊन ये.
मला लपायला हवं...
ते पोतं घ्यायला या
खोलीत येतील.
दगडू एका कोपऱ्यात लपला.
दर वेळेला हे भारी पोतं
मलाच उचलावं लागत.
त्याने पोते उचलून घेतले.
ए
कोण रे
तू?
क्रमशः

# गमाडी गंमत

■ योगिराज माने

गमाडी गंमत करू या
फुलपाखरू शोधू या
रंगीत रंगीत कपडे घालते
भिरभिर भिरभिर भिरभिर पळते
त्याच्यामागे पळू या
कितीही टाका हळूच पाऊल
कशी लागते त्याला चाहूल
याचा शोध घेऊ या
कधीतरी चुकून शाळेत येते
मैदानी ते छान खेळते
त्याला शाळेत घालू या

संपर्क : ९४२२४७०७२०

## इंग्रजी विभाग

# The Raindrop



I am the Raindrop
The life of the earth
Would you like to know
The story of my birth?

When it rains
It rains everywhere
I run to the sea
Through streams and rivers

When in the sea
I am all salty
For the purpose of drinking
I am a little faulty

When the sun burns
I am ready to fly
Transforming into vapour
I go up in the sky

When I meet the cold wind
I am ready for birth
Once again happy
To meet mother earth

Now fresh and pure
I am useful for all
Please save me today
Tomorrow, I will save you ALL

**Santosh Alanjkar**
**Contact : 9423724450**









# Aarya's Reward

ANITA MEHAR - DADHE

Aarya woke up early today. She was in a greater hurry than her Aai. Because there was a play at her school on the occasion of Independence Day and she was playing the role of a soldier. She was excited, so she quickly got ready for school.

On her way to school, Aarya saw all the roads decorated with tricolor pennants and balloons. Patriotic songs were heard everywhere. There were big rangolis in her school. Everything was looking beautiful as it was decorated in tricolor. All the teachers, parents and guests wore white dresses. The flag hoisting ceremony, parade, National Anthem and salute to the Rashtradhwaj made everyone proud of their Nation.

Presentation of the play was held at the end. The spectators praised all the participants because each one got involved wholeheartedly. The children were felicitated by the Chief Guest with a book.

"What do you want to be?" The guest asked the children.

"I want to be a soldier!" exclaimed Aarya.

She was lost in a different world today. She was painting her dreams in her mind. But when she came back home, something was bothering her. She was not as happy as in school. Baba, Aaji, Aajoba asked her about

her school programme. She showed her gift but it lacked 'that' enthusiasm. Aaji told Baba not to press her more to talk about her disappointment.

At noon, they planned to visit the fort. But Aarya refused to go anywhere. It meant that something was genuinely wrong and made her feel terribly sad. While going to the fort Aaji tried to persuade her but she was silent. At a moment Aarya herself asked, "Aaji, is it true that the Independence Day is being celebrated everywhere in our country?"

“Yes beta!” said Aaji.

"Each one is celebrating?" Aarya asked. "Yes Aarya beta!" Aaji said again “No Aaji! Why do they not?" said Aarya pointing out to some children on the footpath.

Now Aaji got the point.

"Aaji, I saw some children of my age. They were selling flags, balloons, badges. Are they celebrating their independence by selling it? Why are they not going to school? They should also have these privileges!". She asked in a breath.

“Oh! Don't panic Aarya! It's nice that you are so sensitive about it. They are also students but they have to work for their need. Though we celebrate the 76th year of Independence, there are so many enemies like poverty, unemployment illiteracy etc. We have to over come these." Aarya was listening intently.

“Aarya, you want to be a soldier right?” Aarya nodded her head.

“Which means you want to serve the nation. But at your age, how will you serve your nation?" Aaji questioned.

Aarya thought for a while.

"By helping these children. Aaji. Yes! and I know, how. By giving them some money!" Aarya exclaimed happily.

“No beta! In this way they will get used to easy and ready money. You may help them by purchasing things from small and retail shops or street vendors." Aaji explained.

Now Aarya's eyes sparkled.

"Aarya, Can you tell me some more ways to serve the nation?" Aaji asked again. Aarya thought for a while and answered, “I can be a better version of myself. I Can help people.”

“Yes! At your age studying loyally, keeping your surrounding clean, including classroom and school can be your contribution to serving the nation. These small things can make a big difference. Use of common vehicles, public transport, use of non-conventional energy sources, keeping wet and dry garbage separately, minimizing or reusing e-waste, using papers sparingly are also some ways to serve our nation." Aaji explained.

"Aaji, Now I know that everyone can serve the nation by doing these simple virtuous deeds. I'll tell my friends too, about it. This Independence Day is a very memorable one for me because I got two rewards." Aarya said.


“And what are they?" Aaji asked. "The first one is that, I got from school and the second one is your teachings. Both are precious and unforgettable. Thank you so much Aaji. Happy Independence Day once again!" And Aarya rushed to her friends to share this treasure.



**Contact : 9404083294**


# Funny Puzzle


Ghanshyam Deshmukh



Copy and colour the picture. Take care to complete the squares one by one while copying

Match the correct part.




# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्रांचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.





## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.
२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ ऑगस्ट २०२३.
३) कोड्याचे उत्तर सप्टेंबर २०२३ च्या अंकात प्रसिद्ध होईल.
४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered R.N.I.NO. 22679/72

Kishor (Marathi) Postal Regd.No. PCW/076/2021-2023 Registered Newspapers posted at PUNE PSO, GPO- 411 001
The date of publication 26.07.2023 Posting on 27th & 28th July 2023
License to Post without prepayment of postage No. WPP-53




ऑनलाईन वर्गणीकरिता क्यूआर कोड स्कॅन करा

प्रति,

If not delivered please return to :

संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग,
पुणे- ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in